www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक १९१ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ ■ रु. २/-

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ घरगुती व लहान स्तरावरील राडारोडा वाहून नेणारी

पान २ वर....



■ रायगडमधील शेतकऱ्यांना शेतीसाठी हवीत आता शेततळी...

पान ६ वर....

# शनिवारी मंत्रिमंडळ विस्तार?

■ फडणवीस यांनी घेतली पंतप्रधान मोदी, अमित शहा, जेपी नड्डा यांची भेट

■ भाजप मंत्र्यांची यादी सादर, केंद्रीय नेतृत्व घेणार अंतिम निर्णय



## अजित पवार यांनी अमित शहा यांची भेट घेतली



“ उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार उपस्थित होते. गेल्या महिन्यात महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत नेत्रदीपक विजय मिळवला होता. भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी आघाडीने २३० जागा जिंकल्या, तर युतीतील लहान पक्षांनी पाच जागा जिंकल्या. २८८ सदस्यीय विधानसभेत विरोधी महाविकास आघाडी आघाडी ४६ जागांवर समाधान मानावे लागले .

● मुंबई, विशाल कारंडे :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यामुळे महाराष्ट्रात मंत्रिमंडळ विस्ताराबाबत खळबळ उडाली आहे. शनिवारी १४ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. याआधी महाआघाडीत सहभागी तिन्ही पक्षांचे नेते मिळून मंत्रिमंडळ विस्तारावर अंतिम शिक्कामोर्तब करणार आहेत.

पान २ वर

## ( ) थोडक्यात ( )



### जैश ए मोहम्मद लिंक प्रकरणी अमरावती, भिवंडीतून दोन संशयितांना घेतलं ताब्यात

**मुंबई :** जैश ए मोहम्मद कट्टरतावाद प्रकरणी एनआयएनं देशभरात छापेमारी केली आहे. या छापेमारीत अमरावती आणि भिवंडीतून दोघांना ताब्यात घेतलं आहे. एनआयएनं जैश ए मोहम्मद कट्टरतावाद प्रकरण देशभरात छापेमारी केल्यानंतर अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

### महिला बुकिंग लिपिकला दक्षता विभागाच्या कारवाईत पकडले

**कल्याण :** कल्याण बुकिंग कार्यालयात दक्षता विभागाच्या कारवाईत एका महिला बुकिंग क्लार्कला पकडण्यात आले असून, तिच्याकडून ९०० रुपयांची वाढीव रक्कम जप्त करण्यात आली आहे.

महिला बुकिंग क्लार्क मंजुषा मते या बुधवारी दुपारी खिडकी क्रमांक-२ येथे ड्युटी करत होत्या.

दरम्यान, मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने तेथे पोहोचून खिडकी क्रमांक-२ चा शोध घेतला. झडती दरम्यान महिला बुकिंग क्लार्क मंजुषा मते यांच्या काउंटरमधून अतिरिक्त ९०० रुपये जप्त करण्यात आले. अशी माहिती रेल्वेच्या एका अधिकाऱ्या कडून मिळाली आहे.

## लाडकी बहीण योजनेतील १६ लाख अर्जांची छाननी होणार

● मुंबई, विशाल कारंडे :



लाडकी बहीण योजनेतील सोळा लाख अर्जांची छाननी होणार असल्याची माहिती समोर येत आहे. आचारसंहितेच्या आधी १६ लाखांची छाननी बाकी होती. ती आता पूर्ण केली जाणार असल्याची माहिती आहे. या सोळा लाख अर्जांपैकी पात्र अपात्र ठरवून लाभ दिला जाणार आहे.

आतापर्यंत राज्यातील दोन कोटी ३४ लाख लाभार्थ्यांना लाडकी बहिणी योजनेचा फायदा मिळाला आहे. यात सोळा लाख अर्जांची छाननी झाल्यानंतर पुन्हा एकदा संख्या वाढणार आहे. निवडणूक काळात प्रशासन व्यस्त असल्याने या सोळा लाख अर्जांची छाननी बाकी होती. त्यामुळे त्यांना लाभ मिळाला नव्हता. आता या सर्व अर्जांची छाननी करून या लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे.

अफवांवर विश्वास ठेऊ नका, अदिती तटकरेंचे आवाहन

लाडक्या बहिण योजनेवरुन वेगवेगळ्या माध्यमातून अफवा पसरवल्या जात आहेत असं अदिती तटकरे म्हणाल्या. त्या म्हणाल्या की, “कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. या योजनेसंदर्भात कोणत्याही लेखी पद्धतीच्या सूचना, कोणतेही आदेश, शासन निर्णय, निकष बदल विभागाने काढलेले नाहीत. विनाकारण काही अफवा पसरवल्या जात आहेत. लाडकी बहिणींच्या लाभार्थ्यांनी कोणतीही मनामध्ये शंका ठेवू नये. लाडकी बहीण योजना महायुतीच्या सरकारने माता-भगिनी साठी काढलेली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली ही योजना यशस्वीरित्या चालू राहणार आहे.”

पान २ वर

## मागेल त्याला सौर कृषी पंप, एक लाखाचा टप्पा ओलांडला

● मुंबई, यश सावंत :

केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर वीजनिर्मिती पॅनेल्स व कृषी पंप असा संपूर्ण संच शेतकऱ्यांना देण्याच्या ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने एक लाख पंप बसविण्याचा टप्पा ओलांडला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचा शेतकऱ्यांची पेड पेंडिंगची समस्या सोडविण्यासाठी ही योजना राबविण्यासाठी आग्रह आहे. शेतकऱ्यांना सिंचनाच्या बाबतीत स्वतंत्र करणारी आणि त्यांना दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध करणारी ही योजना प्राधान्याने राबविण्याची सूचना त्यांनी केली आहे.

सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात आघाडी घेतली असून त्याबद्दल नुकताच



केंद्र सरकारने आयोजित केलेल्या बैठकीत राज्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

राज्यात दि. ११ डिसेंबरपर्यंत एकूण १,०१,४६२ सौर कृषी पंप महावितरणकडून बसविण्यात आले आहेत. यामध्ये सर्वाधिक १५,९४० पंप जालना जिल्ह्यात बसविण्यात आले आहेत. बीड (१४,७०५ पंप), परभणी (९,३३४), अहिल्यानगर (७६३०), छत्रपती संभाजीनगर (६२६७) आणि हिंगोली (६०१४) जिल्ह्यांमध्ये जालन्याच्या खालोखाल पंप बसविण्यात आले आहेत.

पान २ वर

## रत्नागिरीत वायूगळतीची मोठी दुर्घटना अनेक विद्यार्थ्यांना त्रास

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :



रत्नागिरी जिल्ह्यातून मोठी बातमी समोर येत आहे. जिंदाल कंपनीमधून वायूगळती झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना त्रास झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. जयगड येथील नांदीवडे माध्यमिक विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांना वायुगळतीचा मोठा त्रास झाला आहे. अनेक विद्यार्थ्यांना श्वसनाचा आणि उलट्यांचा त्रास होत असल्याची माहिती मिळत आहे. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुार, जवळपास ३५ ते ४०विद्यार्थ्यांना वायुगळतीमुळे त्रास होत आहे. संबंधित प्रकार समोर आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे काही विद्यार्थ्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात, तर काहींना खासगी रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. जिंदाल कंपनीच्या टाक्यांचा मेंटेनन्स सुरू असताना गॅस लिकेज झाल्याचा संशय आहे.

पान २ वर

## अबू सालेमला २५ वर्षांची शिक्षा भोगावी लागेल

● मुंबई, विशाल पाटील :



कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन आणि १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी अबू सालेमच्या शिक्षेसंदर्भात टाडा कोर्टाने मोठा निर्णय दिला आहे. अबू सालेमला २५ वर्षांची शिक्षा भोगावी लागेल असा निर्णय टाडा कोर्टाने दिला आहे. अबू सालेम सध्या नाशिकच्या जेलमध्ये शिक्षा भोगत आहे. अबू सालेमने त्याच्या सुटकेची तारीख जाणून घेण्यासाठी कोर्टात याचिका दाखल केली होती. पण ही याचिका विशेष टाडा कोर्टाने फेटाळून लावली. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील त्याच्या भूमिकेसाठी अबू सालेमला पूर्ण २५ वर्षांची शिक्षा भोगावी लागेल असा निर्णय टाडा कोर्टाने देत त्याची लवकर सुटका करण्याची याचिका फेटाळून लावली आहे. मार्च १९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील दोषी अबू सालेम अब्दुल कय्युम अन्सारी याला दहशतवादी आणि विघटनकारी क्रियाकलाप कायद्यांतर्गत नियुक्त केलेल्या विशेष कोर्टाने २५ वर्षांची शिक्षा भोगावी, असा निर्णय दिला आहे. टाडा कोर्टाने सालेमची याचिका फेटाळून लावली कारण तो लवकर सुटण्याचा हक्कदार नाही. विशेष न्यायाधीश व्ही. डी केदार यांनी ११ जुले २०२२ च्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचा हवाला देत अबू सालेमची याचिका फेटाळून लावली. सालेमच्या गुन्ह्याची गंभीर स्वरूपामुळे त्याची शिक्षा कमी करण्यासाठी कोणतेही विशेषाधिकार मिळत नाहीत यावर भर दिला. सुप्रीम कोर्टाच्या आदेशात असे म्हटले आहे की, ‘अर्जदार ज्या गुन्ह्यात गुंतला होता त्या गुन्ह्याची गंभीरता पाहता, या कोर्टाने अर्जदाराच्या शिक्षेचा कालावधी मर्यादित करण्याचा किंवा प्रवास करण्यासाठी कोणत्याही विशेषाधिकाराचा वापर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.’ यावेळी कोर्टाने ५५ वर्षीय सालेमला २५ वर्षांची शिक्षा पूर्ण करावी लागेल, असे स्पष्टपणे सांगितले.

पान २ वर

## नंदुरबारमध्ये वसतीगृहातील २२ विद्यार्थिनींना विषबाधा

● नाशिक, सचिन कदम :



नंदुरबार जिल्ह्यामध्ये आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थिनींना विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. नवापूर तालुक्यातील चिंचपाडा येथील शासकीय आदिवासी वस्तीगृहातील मुलींना विषबाधा झाली. संध्याकाळी जेवल्यानंतर विद्यार्थिनींची प्रकृती बिघडली. जेवणातून विषबाधा झाल्याचा अंदाज आहे.

वसतीगृहातील ७३ पैकी २२ मुलींना जेवल्यानंतर त्रास झाला. प्रकृती बिघडल्यानंतर विद्यार्थिनींना उपचारासाठी विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एका विद्यार्थिनीला अधिक उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. २१ विद्यार्थिनींचे प्रकृती स्थिर असल्याची वैद्यकीय सूत्रांची माहिती आहे. आदिवासी विकास विभागातील वरिष्ठ अधिकारी विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात आले होते.

## लाच मागितल्याने महिला सरपंचावर गुन्हा




● बदलापूर, रोहित जैसवाल :

नव्याने खरेदी केलेल्या घराची घरपट्टी लावण्याकरता लाचेची मागणी केल्याबद्दल बदलापूरजवळील वांगणी ग्रामपंचायतीच्या सरपंच वनिता आढाव यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराकडून त्यांनी २० हजारांची मागणी केली होती. दहा हजार रुपये स्वीकारण्याचे त्यांनी मान्य केले होते. मात्र संशय आल्याने महिला सरपंचाने लाच स्वीकारली नाही. लाच मागितल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तक्रारदार यांनी वांगणी येथे नवीन घर खरेदी केलेले होते. त्याची घरपट्टी लावण्याकरीता वांगणीच्या सरपंच वनिता आढाव यांनी २० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. मात्र तक्रारदार यांना लाच द्यावयाची नसल्याने त्यांनी १३ नोव्हेंबर २०२४ रोजी वनिता आढाव लाचेची मागणी करीत असल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार नोंदवली. त्याप्रमाणे २६ नोव्हेंबर रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये सरपंच वनिता आढाव यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करून तडजोडीअंती १० हजार रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

पान २ वर

## ‘एक देश, एक निवडणूक’ विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



देशात ‘एक देश, एक निवडणूक’ हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर आज (दि. १२ डिसेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.

एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास ‘एक देश, एक निवडणूक’ धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे.

पान २ वर

### नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू अनुकूल

■ ‘रालोआ’ सरकारमधील प्रमुख दोन घटक पक्ष जनता दल (संयुक्त) आणि तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) यांनी एक देश, एक निवडणूक धोरणाला आधीच पाठिंबा दिला आहे. देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्यामुळे दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात, त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते, त्यामुळे विकासाची गती मंदावते, असा युक्तिवाद भाजपने केला आहे. ‘एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७ मध्ये देशाला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे’, असे मत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सप्टेंबर महिन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मांडले.

## संपादकीय

# नवसंजीवनी मिळणार का ?

खासदारकीची शपथ घेतल्यानंतर आता प्रियंका गांधी यांची प्रत्यक्ष राजकीय कारकीर्द सुरू झाली आहे. त्यांच्यामुळे काँग्रेस पक्षास नवसंजीवनी मिळणार का? या प्रश्नाचे उत्तर भविष्यात मिळणारच.

वायनाडहून काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी लाल रंगाचे पुस्तक हातात धरून खासदारकीची शपथ घेत होत्या तेव्हा कितीतरी जणांना त्यांची आजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आठवण झाली. अनेकांना असं वाटू लागलं जणू इंदिरा गांधी याच शपथ घेत आहेत. इंदिरा गांधी यांनी पहिल्यांदा जानेवारी १९६६ मध्ये पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. खरं म्हणजे, घटनेची प्रत सदैव सोबत ठेवण्याची परंपरा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सुरू केली आहे. राहुल गांधी प्रत्येक ठिकाणी घटनेची प्रत सोबत ठेवतात. लोकसभा निवडणुकीचा प्रचार असो वा लोकसभेत भाषण करतानाचा क्षण असो, कोणताही राजकीय क्षण असो घटनेची प्रत त्यांच्याजवळ असतेच.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारवर हल्लाबोल करण्याचं प्रतीक म्हणजे घटनेची प्रत अशी प्रतिमा राहुल गांधी यांनी तयार केली आहे. इंडिया आघाडीला घटनेची रक्षण करणारी संघटना म्हणूनही त्यांनी पुढं आणले आहे. लोकसभेच्या निवडणुकीत आघाडीला याचा खूप फायदा झाला. परंतु हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूक निकालाने भाजपला पुन्हा राज्यांची सत्ता मिळवून दिली. आघाडीची एकजुटता निष्प्रभावी ठरली काय ? यासारखे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. लोकसभेतील पराभवातून भाजपने काहीतरी धडा घेतला आणि विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्यावेळी त्याची अंमलबजावणी केली.

महाराष्ट्रात भाजप नेत्यांनी अशी काही रणनीती आखली की घटना बदलण्याचा प्रचार फारसा प्रभाव दाखवू शकला नाही. एवढेच नव्हे तर देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या हातातील लाल पुस्तक हे घटनेची प्रत नसून त्याची तुलना चीनच्या 'माओ त्से तुंग' शी केली आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता सरमा यांनी यापूर्वी राहुल गांधी यांच्या हातातील लाल पुस्तकाचा संबंध चीनच्या राज्यघटनेशी जोडला. दुसरीकडे, द लिटिल रेड बुक किंवा कम्युनिस्ट चिनी नेते माओ झेडोंग यांचे संपूर्ण शीर्षक कोटेशन्समध्ये माओच्या प्रसिद्ध म्हणींचा संग्रह आहे. यात त्यांच्या प्रसिद्ध विधानाचा समावेश आहे, 'राजकीय शक्ती बंदुकीच्या नळीतून येते.' राजकारणात लाल रंगाचा बहुधा मार्क्सवादी किंवा साम्यवादी विचारसरणीशी संबंध असतो. भाजपने लाल रंगाचे कव्हर असलेले पण आतून कोरे असलेले पुस्तक वाटून राहुल गांधी यांच्या हातातील पुस्तक घटनेची प्रत नव्हे तर कोरे कागद आहेत असा प्रचार केला. ज्या ठिकाणी राहुल गांधी यांची सभा व्हायची तेथे तेथे भाजपकडून ही पुस्तका वाटली जात होती. काँग्रेसने भाजपचा हा डाव उलटून लावण्याचा प्रयत्न केला. मात्र, निवडणुकीत जेवढा फायदा व्हायला हवा होता तेवढा होऊ शकला नाही. महाराष्ट्र आणि झारखंडसोबतच १४ राज्यांत विधानसभेच्या जागांवर झालेल्या पोटनिवडणुका आणि दोन राज्यांत लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीचा निकालसुद्धा लागला. लोकसभेच्या दोन्ही जागा काँग्रेसने जिंकल्या. केरळच्या वायनाडहून प्रियंका गांधी विजयी झाल्या, तर नांदेडमधून रवींद्र चव्हाण विजयी झाले. अशातच, प्रियंका गांधी यांनी संसदेत खासदारकीची शपथ घेताना हातात घटनेची प्रत ठेवली. नंतर लगेचच प्रियंका गांधी यांनी सत्ताधारी पक्षावर तोफ डागली. भाजपने राज्यघटनेचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आणि शहरी नक्षलवादाशी संबंध असल्याबद्दल भाजपचा हल्लाही फेटाळला. त्यांची लोकसभेतील उपस्थिती पक्षाच्या रणनीतीला नवा आयाम देणार हे निश्चित. गांधी घराण्याची प्रतिष्ठा आणि शैली पाहता प्रियंका गांधी नक्कीच सर्वसामान्यांच्या हृदयाला स्पर्श करू शकतील. त्यांच्या चेहर्यांवरील स्मितहास्यापुढे सत्ताधार्यांचे डावपेच निष्क्रिय ठरल्याशिवाय राहणार नाही. याच गुणांमुळे प्रियंका गांधी यांच्याकडे त्यांची आजी इंदिरा गांधी म्हणूनही बघितले जाते. इंदिरा गांधी यांच्यात शेवटच्या रांगेत उभ्या असलेल्या व्यक्तीशी संपर्क साधण्याची आणि त्यांची दुर्दशा समजून घेण्याची क्षमता होती. इंदिरा गांधींचे हृदय गरिबांसाठी नेहमीच धडधडत असे. प्रियंका एक नैसर्गिक नेत्या असल्याचे जाणवते. यामुळेच अनेकांना त्यांच्यात इंदिरा गांधींची प्रतिमा दिसते आणि त्यांना घराण्याचा राजकीय वारसा पुढे नेणारा नेता मानतात. नवा अध्याय असा आहे की प्रियंका गांधी आता खासदार आहेत. इंदिरा गांधी यांच्याकडेही हे सर्व गुण होते. धैर्य आणि लोकांमध्ये काम करणे ही त्यांची वैशिष्ट्ये होय. प्रियकांनी शपथविधी सोहळ्यात घातलेली कासवू साडी देखील त्यांच्या आजीच्या आठवणींना उजाळा देणारीच आहे. इंदिरा गांधी यांच्या पोशाखात अनेकदा प्रतिकात्मक संदेश असायचे आणि त्यांच्या कपड्यांचा उद्देश नेहमी लोकांशी संपर्क साधण्याचा असायचा. शपथ घेताना आपल्याला आजी आणि वडील दोघांचीही आठवण येत होती असे प्रियंका गांधी यांनी म्हटले आहे. संसदेत पोहोचणे हे प्रियंका गांधी यांच्यासाठी पहिले पाऊल आहे. पुढचा रस्ता लांब आणि अवघड आहे. आजी इंदिरा गांधी यांच्याप्रमाणे प्रियंका गांधी यांना सत्तेचे विशेषाधिकार मिळत नाहीत किंवा त्यांना कोणत्याही सरकारचा पाठिंबा नाही. उलट त्या सत्ताधारी पक्षाकडून टोमणे मारण्याचे आणि शाब्दिक हल्ल्यांचे लक्ष्य बनत आहे. तरीही त्या खंबीर आहे. प्रत्येक हल्ला त्यांनी शिताफीने परतवून लावला आहे. प्रियंका गांधी समर्थकांसाठी आशेचा किरण आणि काँग्रेससाठी नवी ऊर्जा आहे. भाऊ आणि बहीण यांच्यातील अनोखे नाते हे पक्षासाठी एक अतिरिक्त फायदा आहे.

# घरगुती व लहान स्तरावरील राडारोडा वाहून नेणारी

मुंबईतील 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेची मागणी नोंदवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहर व पूर्व उपनगरांसाठी १८००-२०२-६३६४ आणि पश्चिम उपनगरांसाठी १८००-२१०-९९७६ हा टोल फ्री क्रमांक सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० या वेळेत उपलब्ध करुन दिला आहे. तर, 'मायबीएमसी' मोबाईल ऍपच्या माध्यमातून लवकरच ऑनलाईन पर्याय कार्यान्वित करण्यात येणार आहे जो २४ तास उपलब्ध असेल. राडारोडा संकलनापासून ते प्रक्रियेपर्यंत ऑनलाईन प्रणालीद्वारे हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याने ही सेवा अधिक सुलभ, जलद होणार आहे. संपूर्ण भारतातील अशा प्रकारचा 'ऑनलाईन' सेवा असलेला हा पहिलाच उपक्रम आहे. तर प्रतिदिन १२०० टन प्रक्रिया ही क्षमता लक्षात घेता महाराष्ट्रातील सर्वात मोठा असा हा प्रकल्प आहे.

विशेष म्हणजे, या प्रकल्पात ५०० किलोग्रॅमपर्यंतची डेब्रीज संकलन सेवा विनामूल्य पुरवण्यात येणार आहे. त्यामुळे घरगुती व लहान स्तरावरील डेब्रीज संकलनाचे प्रमाण तर वाढेलच पर्यायाने अनधिकृतपणे डेब्रीज टाकण्यापासून संबंधित घटक परावृत्त होतील व अशा प्रकारांना आळा बसेल, याची महानगरपालिका प्रशासनाला खात्री आहे.

मुंबईतील घरगुतीस्तरावरील बांधकाम आणि पाडकाम यातून निर्माण होणारा राडारोडा (डेब्रीज) उचलून वाहून नेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून 'डेब्रीज ऑन कॉल' ही सेवा सन २०१४ पासून पुरवली जाते. घरगुती तसेच लहान स्तरांवरील बांधकाम, पाडकाम, दुरुस्तीची कामे यातून निर्माण होणारे डेब्रीज संकलन करुन वाहून नेण्यासाठी ही सेवा माफक दरात कार्यरत आहे. रस्त्यावर तसेच इतरत्र टाकून देण्यात येणारे डेब्रीजचे प्रकार टाळण्यासाठी सुरु केलेली ही सेवा अल्पावधीत



नागरिकांच्या पसंतीस उतरली. महानगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय विभाग कार्यालय (वॉर्ड) निहाय ही सेवा उपलब्ध आहे. वॉर्डनिहाय पुरवलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर ही सेवा पुरवली जाते.

असे असले तरी, मुंबई महानगराचा विस्तार पाहता, त्या तुलनेत घरगुती व लहान स्तरावर निर्माण होणा-या डेब्रीजचे अधिकाधिक संकलन व्हावे, त्याचप्रमाणे रस्त्यांच्या कडेला व इतरत्र टाकून देण्यात येणा-या अनधिकृत डेब्रीजचे प्रकार रोखता यावेत तसेच शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करुन सदर डेब्रीज पुनर्प्रक्रिया करुन वापर करण्याकरीता उपलब्ध व्हावे, यासाठी ही सेवा अधिक सुलभ, वेगवान व काळानुरुप ऑनलाईन पर्यायांसह उपलब्ध करुन देण्याची गरज निर्माण झाली होती. याबाबतचा अभ्यास करुन लोकाभिमुख, अधिक कार्यक्षम व्यवस्था उभी करण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी दिले होते. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प विभागाने 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेचा लोकाभिमुख विस्तार केला आहे, अशी माहिती श्री. किरण दिघावकर उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) (प्रभारी) यांनी दिली आहे.

या नवीन 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) टोल फ्री क्रमांक- घरगुती व लहान स्तरावरील बांधकाम, दुरुस्ती, पाडकाम यातून निर्माण होणारा राडारोडा (डेब्रीज) वाहून नेण्यासाठी मुंबईकरांना आता प्रशासकीय विभाग कार्यालय (वॉर्ड) निहाय दूरध्वनी क्रमांक लक्षात ठेवून त्यांच्यावर संपर्क साधण्याची गरज नाही. त्याऐवजी, 'डेब्रीज ऑन कॉल' करिता मुंबई शहर व पूर्व उपनगरांमधील नागरिकांनी १८००-२०२-६३६४ या टोल फ्री क्रमांकावर व पश्चिम उपनगरांतील नागरिकांना १८००-२१०-९९७६ या टोल फ्री सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० या वेळेत क्रमांकावर संपर्क साधता येईल. त्यामुळे संपर्काची सुविधा सुटसुटीत झाली आहे. परिणामी, वॉर्डनिहाय क्रमांकाऐवजी या दोन क्रमांकांवरुन संपूर्ण मुंबई महानगरातील नागरिकांना सेवा पुरवली जाईल.

२) 'मायबीएमसी' मोबाईल ऍप- बृहन्मुंबई महानगरपालिकेचे 'मायबीएमसी' हे मोबाईल ऍप नागरी सेवा-सुविधांशी संबंधित आहे. या मोबाईल ऍपमध्ये नागरिकांना 'डेब्रीज ऑन कॉल' चा पर्याय लवकरच उपलब्ध केला जाणार आहे. त्या पर्यायावर प्रवेश केल्यानंतर त्यामध्ये मुंबई शहर व पूर्व उपनगरांसाठी एक तर पश्चिम उपनगरांसाठी दुसरा असे दोन पर्याय आढळतील. योग्य पर्याय निवडल्यावर 'डेब्रीज ऑन कॉल' शी संबंधित स्वतंत्र मोबाईल ऍप इन्स्टॉल करता



येईल. त्या ऍपमध्ये सर्व माहिती भरल्यानंतर महानगरपालिकेकडे मागणीची नोंद होईल.

३) जलद गतीने होणार कार्यवाही- महानगरपालिकेकडे मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ पर्यवेक्षक (Junior Supervisor) प्रत्यक्ष ठिकाणी भेट देवून पाहणी करुन खातरजमा करतील. तसेच डेब्रीज नेण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचा अंदाज घेतील. त्यांच्याकडून मागणी मंजूर होवून लागू असणारे शुल्क ऍपद्वारे कळवले जाईल. तसेच, मागणी मंजूर केल्याचे संबंधित नागरिकांस मोबाईल ऍपवर, व्हॉटस्ऍपवर कळवले जाईल. लागू असलेले शुल्क भरणा केल्यानंतर ४८ तासांच्या आतमध्ये डेब्रीज संकलन करुन वाहून नेण्यात येईल.

४) ५०० किलोग्रॅमपर्यंत विनामूल्य सेवा, त्यापुढील दरही माफक- 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेमध्ये आता ५०० किलोग्रॅमपर्यंतच्या डेब्रीजसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. ती सेवा पूर्णपणे विनामूल्य असेल. त्यापुढील डेब्रीजसाठी देखील अत्यंत माफक दर आकारले जाणार आहेत.

५) ऑनलाईन पेमेंट सुविधा- 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेसाठी रक्कम देखील ऑनलाईन पद्धतीने प्रदान करण्याची सुविधा नागरिकांना मिळणार आहे. संबंधित मोबाईल ऍपद्वारे रकमेचा भरणा करता येईल. त्याची पावती देखील ऍपमध्ये त्याचप्रमाणे व्हॉटस्ऍपद्वारे दिली जाईल. ज्यांना ऑनलाईन भरणा करण्याऐवजी रोखीने रक्कम द्यायची असेल, त्यांनी प्रत्यक्ष भेट देणारे महानगरपालिकेचे कनिष्ठ पर्यवेक्षक (Junior Supervisor) यांच्याकडे रक्कम दिल्यानंतर पावती देण्यात येईल. ती रक्कम संबंधित कनिष्ठ पर्यवेक्षक महानगरपालिकेकडे जमा करतील.

६) पुढील २० वर्षांसाठी कंत्राटदार नियुक्त- 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेचा लोकाभिमुख विस्तार करताना महानगरपालिकेने पुढील तब्बल २० वर्षांच्या कालावधीसाठी कंत्राटदार नियुक्त केले आहेत. राडारोडा संकलन, वाहतूक, त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करणे, त्यासाठी जागा मिळवून प्रकल्प उभारणे, मनुष्यबळ व संयंत्रे इत्यादी यंत्रणा उभी करणे, या सर्व बाबींची जबाबदारी ही कंत्राटदारावरच सोपविण्यात आली आहे. परिणामी महानगरपालिकेवर प्रकल्प जागा, भांडवली गुंतवणूक, परिरक्षण व तत्सम भांडवली बाबीच्या खर्चाचा भार आलेला नाही.

यामध्ये, मुंबई शहर (कुलाबा ते शीव) व पूर्व उपनगरांसाठी (कुर्ला ते मुलुंड) मेसर्स मेट्रो वेस्ट हॅण्डलिंग प्रा. लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा प्रकल्प हा शिळफाटा, डायघर गाव येथे पाच एकर जागेवर स्थित आहे. या प्रकल्पाची प्रक्रिया क्षमता ६०० टन प्रति दिन इतकी आहे.

तर पश्चिम उपनगरांसाठी (वांद्रे ते दहिसर) मेसर्स एजी एनव्हायरो इन्फ्रा प्रा. लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा प्रकल्प हा दहिसर, कोकणीपाडा येथे पाच एकर जागेवर स्थित आहे. या प्रकल्पाची प्रक्रिया क्षमता ६०० टन प्रतिदिन इतकी आहे. म्हणजेच, दोन्ही कंत्राटदारांची एकत्रित सेवा लक्षात घेता, प्रतिदिन १२०० टन डेब्रीजवर प्रक्रिया होणार आहे. त्यादृष्टिने महाराष्ट्रातील हा सर्वाधिक क्षमतेचा प्रकल्प ठरला आहे.

या दोन्ही कंत्राटदारांची सेवा दिनांक ४ नोव्हेंबर २०२४ पासून सुरु झाली आहे.

७) पर्यावरणपूरक उपक्रम- 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेसाठी नियुक्त कंत्राटदारांच्या प्रकल्पांमध्ये राडारोडा नेल्यावर त्याठिकाणी डेब्रीजवर शास्त्रोक्त प्रक्रिया केली जाईल. त्यातून तयार होणारे वाळूसदृश्य घटक हे पेवर ब्लॉक, दुभाजक, पदपथांसाठी लागणारे दगड, बाक (बेंच) यासारख्या संरचनाविरहीत (नॉन स्ट्रक्चरल) बाबींच्या निर्मितीसाठी संबंधित उद्योगांना वापरात येवू शकतील. ही जबाबदारी देखील संबंधित कंत्राटदारांवर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे ही नवीन 'डेब्रीज ऑन कॉल' सेवा जशी लोकाभिमुख आहे, तशीच ती पर्यावरणपूरक देखील ठरणार आहे.

८) भारतातील पहिलाच प्रकल्प- विशेष म्हणजे, वर नमूद केलेल्या वैशिष्ट्यांसह 'डेब्रीज ऑन कॉल' सेवा असलेला भारतातील हा पहिलाच प्रकल्प आहे ज्यामध्ये राडारोडा संकलनापासून ते प्रक्रियेपर्यंत 'ऑनलाईन' प्रणालीद्वारे राबविण्यात येणार आहे. स्वाभाविकच अशी सेवा पुरवणारी बृहन्मुंबई महानगरपालिका ही भारतातील पहिलीच संस्था ठरली आहे.

नव्या स्वरुपात सुरु केलेली 'डेब्रीज ऑन कॉल' सेवा नुकतीच सुरु झालेली असून प्रारंभीचा कालावधी हा प्रायोगिक स्वरुपाचा आहे. नागरिकांना या सेवेमध्ये येणारे अनुभव लक्षात घेवून, त्यांच्या सूचना विचारात घेवून त्यात अधिकाधिक सुधारणा करण्यात येतील, मुंबईकरांनी या 'डेब्रीज ऑन कॉल' सेवेला अधिकाधिक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) (प्रभारी) श्री. किरण दिघावकर यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने केले आहे.

## पान १ वरून...

### लाडकी बहीण योजनेतील...

जुन्या अर्जांची छाननी होणार नाही

आदिती तटकरे यांनी या आधीही लाडकी बहीण योजनेवरून स्पष्टीकरण दिलं होतं. त्या म्हणाल्या होत्या की, "लाडकी बहीण योजने जवळपास दोन कोटी ३४ लाख महिला लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांची कोणत्याही प्रकारची छाननी होणार नाही. छाननीबाबत चुकीचे वृत्त समोर येत आहे. या योजनेचे जे लाभार्थी आहेत त्यांना योग्य पद्धतीने लाभ मिळालेला आहे. या योजनेच्या काही लाभार्थी महिलांच्या अर्जांबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींबाबतसंबंधित विभाग निर्णय घेईल. पण सध्यातरी अर्जांच्या छाननीबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. सध्या मी त्या विभागाची मंत्री नाही. मात्र मी जेव्हा मंत्री होते, त्यावेळी असा कुठलाही निर्णय घेतलेला नाही. जे लाभार्थी आहेत, त्यांना योग्य पद्धतीने पैसे देताना याआधीच अर्जांची छाननी करण्यात आलेली आहे."

### मागेल त्याला सौर कृषी पंप, एक...

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्य सरकारने राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. दहा लाखापेक्षा जास्त पंप बसविण्यात येणार असल्याने कृषी पंपासाठी पैसे भरून वीज कनेक्शनची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सुटणार आहे.

या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषी पंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो.

महावितरणने आतापर्यंत गेल्या काही वर्षात विविध योजनांच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून २ लाख सौर कृषी पंप बसविले असून त्यापैकी एक लाख पंप मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत या वर्षी बसविले आहेत व देशात अतुलनीय कामगिरी केली आहे.

सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीज पुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

### रत्नागिरीत वायूगळतीची मोठी...

या प्रकरणी आता प्रशासनाकडून युद्ध पातळीवर सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. संबंधित घटना नेमकी का घडली आणि ती पुन्हा घडू नये, यासाठी काय-काय काळजी घेतली जाणार? हे पाहणं आता महत्त्वाचं आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांची प्रकृती लवकर बरी व्हावी, अशी प्रार्थना त्यांचे आई-वडील आणि रत्नागिरीतील सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, रत्निगिरीत गेल्या आठवड्यातही एका टँकरमधून गॅस गळतीची घटना घडली होती. टँकरमधून गॅस गळती होत असल्याचं चालकाच्या लक्षात आल्यानंतर त्याने लगेच नागरिकांकडे मदत मागितली होती. शहरातील डी-मार्टजवळ टँकर आल्यानंतर ही घटना घडली होती. यानंतर अग्निशामक दलाला घटनास्थळी पाचरण करण्यात आलं होतं. अग्निशामक दलाच्या जवानांनी गॅस गळती थांबवली होती. यानंतर स्थानिकांनी सुटकेचा श्वास सोडला होता.

### अबू सालेमला २५ वर्षांची शिक्षा...

अबू सालेमच्या याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला की त्याच्या शिक्षेत २ वर्षे आणि १० महिन्यांची माफी, चांगली वागणूक आणि विशेष प्रसंगी मंजूर केली गेली पाहिजे.

या याचिकेमध्ये त्याने दावा केला की, त्याची एकूण कारावास २५ वर्षांपर्यंत पोहोचला. मात्र, कोर्टाने हा युक्तिवाद फेटाळून लावला.

११ नोव्हेंबर २००५ रोजी पोर्तुगालमधून प्रत्यार्पण केलेल्या, सालेमला खटल्याचा सामना करावा लागला आणि १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांसह दोन टाडा खटल्यांमध्ये त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली.

### लाच मागितल्याने महिला...

त्यानंतर सर्व कायदेशिर बाबींचे अवलंब करून तक्रारदार सरपंचांना लाचेची रक्कम देण्याकरीता गेल्या असता त्यांना काहीतरी संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम स्विकारली नाही. मात्र लाचेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दाखवल्याने त्यांच्यावर कुळगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### 'एक देश, एक निवडणूक'...

त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे. भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये 'एक देश, एक निवडणुकी'च्या आश्वासनाचा समावेश होता. शिवाय, 'रालोआ ३.०' सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या लक्ष्यपूर्तीमध्येही हे धोरण सामील करण्यात आले होते. सरकारने मंगळवारी (१७ सप्टेंबर) १०० दिवस पूर्ण केले असून त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने कोविंद अहवालाला मंजुरी दिली होती.

### शनिवारी मंत्रिमंडळ विस्तार?

दिल्ली दौऱ्यावर असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मंत्रिमंडळ विस्ताराची संभाव्य तारीख १४ डिसेंबर असल्याचे सांगितले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार भाजपच्या १५ ते १६ आमदारांना मंत्री केले जाऊ शकते, तर शिंदे गटातील १० आणि अजित पवार गटातील ८ आमदार मंत्री होऊ शकतात. मंत्रिमंडळात ८ ते १० पदे रिक्त राहण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसह ४३ मंत्री असू शकतात. त्यांच्या मंत्रिमंडळातील संभाव्य भाजप मंत्र्यांची नावे निश्चित झाली असून, अंतिम निर्णय पक्षाचे केंद्रीय नेतृत्व घेईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि ज्येष्ठ नेते बीएल संतोष यांच्या बैठकीत मंत्रिमंडळ विस्तारावर चर्चा झाली. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. फडणवीस म्हणाले की, मंत्रिमंडळ विस्ताराची तारीख अजून ठरलेली नाही. याबाबतचा फॉर्म्युला ठरला असून त्याबाबत तुम्हाला लवकरच कळेल. पंतप्रधान मोदींची भेट घेतल्यानंतर फडणवीस यांनी 'एक्स' पोस्टमध्ये म्हटले आहे की, गेल्या १० वर्षांत तुमच्या पाठिंब्याने महाराष्ट्र जवळपास प्रत्येक क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आला आहे आणि आता तुमच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली आम्ही विकासाचा हा प्रवास पुढे नेण्यासाठी सज्ज आहोत. पुढील स्तरावर उद्दिष्ट आहे. मोदींनी दिलेला बहुमोल वेळ, मार्गदर्शन, आशीर्वाद आणि महाराष्ट्राच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिल्याबद्दल मी त्यांचे अत्यंत आभारी असल्याचे ते म्हणाले. आमच्यासारख्या कोट्यवधी भाजप कार्यकर्त्यांसाठी तुम्ही नेहमीच अधिक कष्ट करण्याची प्रेरणा आहात, असे ते म्हणाले. पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले की, मंत्रिमंडळ विस्ताराबाबत कोणताही मुद्दा नाही. मी येथे माझ्या पक्षाच्या नेत्यांना भेटण्यासाठी आणि भाजपमधून कोण मंत्री होऊ शकते यावर चर्चा करण्यासाठी आलो आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# भातसा प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी मिळण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**ठाणे (रोहित जैसवाल) :** भातसा प्रकल्पात रब्बी हंगाम राबविण्यास पाणीसाठा उपलब्ध असून रब्बी हंगामासाठी पाच पाणी पाळया देण्याचे प्रस्तावित आहे. रब्बी हंगामात गहू, चना, तूर, कापूस, मिरची व इतर चाऱ्यांच्या पिकांना कालव्याचे प्रवाही / कालव्यावरील नदी-नाल्यांवरील मंजूर उपसा सिंचन योजनाद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी अर्ज मागणी नमुना नं. ७ दि. १५ डिसेंबर २०२४ पूर्वी संबंधीत उपविभागीय/ शाखा कार्यालयास सादर करावे, असे आवाहन भातसा धरण व्यवस्थापन विभाग भातसानगरचे कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

भातसा मोठा प्रकल्प उजवा मुख्य कालवा किमी १.०० ते ५४.०० व डावा कालवा १.०० ते २.०० मधील लाभक्षेत्रातील व त्यावरील सर्व वितरिका, अधिसूचीत नदी नाल्यावरील लाभधारकांनी पाणी अर्ज नमुना ७ अ, ७ ब कोरे फॉर्म संबंधीत उपविभीय/ शाखा कार्यालयात मिळतील.

अर्ज मिळण्याचे कार्यालय / सिंचन शाखा कार्यालय - अ) भातसा प्रकल्प, सहा. अभि. श्रे.-१, भातसा उजवा कालवा उपविभाग, शहापूर जि.ठाणे (भातसा उजवा तीर कालवा कि.मी.२ ते ५४).



**लाभक्षेत्रातील गावांची नांवे** - शहापूर तालुका :- साजिवली, खुटाडी, सरलांबे, अर्जुनली, खरीवली, तुते, आवरे, कांबारे, कवडास, बामणे, चेरपोली, शहापूर, गोठेघर, वाफे, कळंभे, वेहळेली खातिवली, भातसई, वासिंद दहागांव.

**भिवंडी तालुका :-** सारमाळ, साने, पाली, जांभिवली (प.) पच्छापूर, महाप, शिरगांव, तुळशी, शिरोळा, दाभाड, जाभिवली (को.) चाणे, झिडके, खातिवली, वेढेगांव, वेढेपाडा, सावरोली, (कॉ.), घोटगाव, कासणे, खानीवली, तळवली, कोशीबी, कांदळी, कळंबोली, वडवली, भोकरी, डोहाळे, उंबरखांड, मॉहडूळ, नेवाडे.

अर्ज मिळण्याचे कार्यालय / सिंचन शाखा कार्यालय - ब) भातसा प्रकल्प सहा. अभि. श्रे.-१, भातसा उजवा कालवा उपविभाग, शहापूर जि.ठाणे (भातसा डावा तीर कालवा कि.मी. १ ते २ सावरशेत.)

**लाभक्षेत्रातील गावाची नावे** - सावरशेत.

अर्ज मिळण्याचे कार्यालय / सिंचन शाखा कार्यालय - क) भातसा नदी उपविभागीय अभियंता, भातसा डावा कालवा, उपविभाग शहापूर, जि. ठाणे.

**लाभक्षेत्रातील गावांची नांवे** - भातसा उजव्या व डाव्या तीरावरील गावे.

नमुना नं.७ चा अर्ज प्राप्त झालेल्या अर्जधारकांना विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येणार आहे.

## हरविलेल्या महिलेचा व मुलाचा शोध





**ठाणे** - सिमा आखील शेख (वय २३ वर्षे, रा. बंजारा वस्ती, सेवालाल नगर, मेंटल हॉस्पिटल जवळ, वागळे ईस्टेट, ठाणे पश्चिम) ही महिला सोबत आहिल नावाचा मुलगा (वय १ वर्ष) हे दोघे हरविल्याची नोंद वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

**हरविलेल्या महिलेचे वर्णन :-** चेहरा उभट, रंग गोरा, उंची अंदाजे ४ फूट ५ इंच, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे लांब, अंगाने मध्यम, उंची ४ फूट ५ इंच, अंगात फिक्कट निळया रंगाची मॅक्सी त्यावर पांढऱ्या रंगाची बुटी असलेला.

**हरविलेल्या मुलाचे वर्णन :-** चेहरा गोल, रंग गोरा, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे, अंगाने सुदृढ.

वरील वर्णनाची महिला व मुलगा जर कोणास आढळल्यास तर त्यांनी वागळे इस्टेट पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन वागळे ईस्टेट पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार डी.ई. शिरसाठ यांनी केले आहे.

## हरविलेल्या तरुणीचा शोध



**ठाणे** - पायल शंकर अंभोरे (वय २० वर्षे, बंजारा वस्ती, सेवालाल नगर, मेंटल हॉस्पिटल जवळ, वागळे ईस्टेट, ठाणे पश्चिम) ही तरुणी हरविल्याची नोंद वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

**हरविलेल्या तरुणीचे वर्णन :-** चेहरा गोल, रंग सावळा, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे लांब, अंगाने मध्यम, उंची अंदाजे ४ फूट ५ इंच, उंची ४ फूट ५ इंच, अंगात हिरव्या रंगाचा पंजाबी ड्रेस आहे.

वरील वर्णनाची तरुणी जर कोणास आढळल्यास तर त्यांनी वागळे इस्टेट पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन वागळे इस्टेट पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार डी.ई.शिरसाठ यांनी केले आहे.

## हरविलेल्या तरुणाचा शोध



**ठाणे** - कु. शुभम प्रकाश क्षीरसागर (वय २८ वर्षे, रा. आम्हीधारा बिल्डिंग, रुम क्र.२०४, क्रॉस गार्डन, भाईंदर पश्चिम) हा तरुण हरविल्याची नोंद वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

**हरविलेल्या तरुणाचे वर्णन :-** रंग सावळा, चेहरा उभट, डोळे काळे, केस काळे वाढलेले, उंची ५ फूट ६ इंच, अंगात काळया पिवळया रंगाचा टि शर्ट व फिक्कट निळया रंगाची फुल जीन्स पॅन्ट आहे.

वरील वर्णनाचा तरुण जर कोणास आढळल्यास तर त्यांनी वागळे इस्टेट पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन वागळे ईस्टेट पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार डी.ई. शिरसाठ यांनी केले आहे.

## अनोळखी मयत तरुणाच्या वारसांचा शोध

**ठाणे** - अनोळखी मयत इसम (अंदाजे वय ३५ वर्षे) ठाणे रेल्वे स्टेशन बाहेरील रिक्षा स्टॅण्ड समोर फुटपाथवर कोणत्यातरी शारीरिक आजाराने आजारी असल्याने त्यास दवा उपचारासाठी सिव्हिल हॉस्पीटल ठाणे येथे दाखल केले असता, त्याच्यावर उपचार चालू असताना त्याचे निधन झाल्याची नोंद ठाणेनगर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

अनोळखी मयत तरुणाचे वर्णन :- सडपातळ, उंची ५ फूट ५ इंच, रंग गोरा, डोळे बंद, उघडे, तोंड बंद, नाक सरळ, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे वाढलेले, अंगात सफेद व आकाशी रंगाचा हाफ टी शर्ट व काळया व पांढऱ्या रंगाची चेक्स बरमुडा पॅन्ट.

वरील अनोळखी मयत तरुणाचे जर कोणी वारस किंवा नातेवाईक असतील तर त्यांनी ठाणे नगर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन ठाणेनगर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार जी.व्ही. साळेकर यांनी केले आहे.

# ३१ मार्चपर्यंत १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर वाहनांवर HSRP नंबरप्लेट बसवणे बंधनकारक

### कल्याण आरटीओ कार्यक्षेत्रासाठी नेमण्यात आली एजन्सी




**कल्याण (विवेक गुंजाळ) :** महाराष्ट्रातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर उच्च सुरक्षा वाहन क्रमांक प्लेट (हाय सिक्युरिटी नंबरप्लेट - HSRP) बसविणे बंधनकारक करण्यासंबंधीचे निर्देश राज्याच्या परिवहन आयुक्तांनी दिले आहेत. त्यानुसार कल्याण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांवर ही HSRP हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविणे बंधनकारक असून ३१ मार्च २०२५ पूर्वी ही नंबरप्लेट बसवण्याचे आवाहन कल्याण आरटीओचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी केले आहे. ही HSRP हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाकडून कल्याण उप प्रादेशिक कार्यालयाकरता मे. रियल माझोन इंडिया एजन्सीची नियुक्ती करत त्यासाठी लागणारे शुल्कही निर्धारित करण्यात आले आहे.

राष्ट्रीय सुरक्षा, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी व्हावेत, छेडछाड आणि बनावटगिरी रोखण्यासाठी तसेच रस्त्यांवर चालणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची ओळख पटविण्यासाठी या व अशा अनेक प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मोटार वाहनांवरील हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट बसविणे अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील सर्व मोटार वाहनांवर अशा नंबरप्लेट बसविण्याबाबत निर्देश जारी केले आहेत.

राज्यात सन २०१९ पासून नव्या उत्पादित वाहनांना HSRP नंबरप्लेट सक्तीची केली असून वाहनाला ही नंबरप्लेट एकदा लावल्यानंतर ती पुन्हा काढता येत नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बनविण्यात आलेली नंबरप्लेट टॅम्परप्रुफ असते. ही नंबरप्लेट अल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनविलेली असते. या नंबरप्लेटवर निळया रंगाच्या चक्राचे होलोग्राम आणि वाहन क्रमांकाच्या काळया तिरप्या ओळीत IND अशी अक्षरे लिहिलेली असतात.

HSRP हाय सिक्यूरिटी नंबरप्लेटचे महत्व लक्षात घेता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दि. ०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांवर हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट (HSRP) नंबरप्लेट बसविणे बंधनकारक असून त्याकरीता परिवहन विभागाने या कार्यालयासाठी नियुक्त केलेल्या मे. रियल माझोन इंडिया एजन्सीकडून ही नंबरप्लेट बसवून घेता येईल.

## ठाण्यातील काही भागात दोन दिवस टप्प्याटप्प्याने होणार पाणीपुरवठा

**ठाणे (सम्यक कासारे) :** ठाणे महानगरपालिकेला मे. स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा शुक्रवार दि.१३/१२/२०२४ रोजी सकाळी ९.०० वा ते शनिवार दि.१४/१२/२०२४ रोजी सकाळी ९.०० वा पर्यंत असा २४ तासांचा शटडाऊन घेऊन देखभाल, दुरुस्ती आवश्यक कामे तातडीचे करुन घेण्यात येणार आहेत. तथापि ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करुन टप्या टप्याने ठाणे शहरात एक वेळ पाणी पुरवठा सुरु ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार घोडबंदर रोड, पातलीपाडा, पवारनगर, कोठारी कम्पाउंड, आझादनगर, डॉगरीपाडा, वाघबीळ, आनंदनगर, कासारवडवली, ओवळा, इत्यादी ठिकाणाचा पाणी पुरवठा दि.१३/१२/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी ०९.०० ते रात्री ०९.०० वाजे पर्यंत बंद राहील व समतानगर, ऋतुपार्क, सिध्देश्वर, इंटरनिटी, जॉन्सन, जेल, साकेत. उथळसर, रेतीबंदर, कळव्याच्या व मुंब्राचा काही भाग शुक्रवार दि.१३/१२/२०२४ रात्री ९.०० ते शनिवार रोजी सकाळी ०९.०० वा.पर्यंत पाणी पुरवठा बंद राहील. अश्या रीतीने टप्या टप्याने एक वेळ पाणी पुरवठा सुरु ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. वरील शटडाऊन मुळे पाणी पुरवठा पुर्व पदावर येईपर्यंत पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा व ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.



## ठाण्याच्या सर्वसमावेशक वाहतूक आराखड्याची आयआयटी-मुंबईमार्फत होणार फेरआखणी




**ठाणे (यश सावंत) :** ठाणे महापालिकेतर्फे २०१८मध्ये तयार करण्यात आलेल्या सर्वसमावेश वाहतूक आराखड्याची आताच्या बदललेल्या स्थितीनुसार फेरआखणी करण्यात येणार आहे. आयआयटी, मुंबईच्या 'जीआयएसई हब'च्या मदतीने फेरआखणीचे काम करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात, आयआयटी, मुंबईतील जीआयएसई हबचे प्रा. सुमीत सेन यांच्यासोबत यासंदर्भात नुकतीच एक बैठक झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, उपायुक्त शंकर पाटोळे, उपनगर अभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता धनाजी मोदे आणि भगवान शिंदे उपस्थित होते.

**वर्षभरात होणार फेरआखणी**

या आराखड्यातील तरतूदी आणि सद्यस्थिती तसेच भविष्यातील आव्हाने यांचा अभ्यास करून आराखड्याची फेरमांडणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. २०१८मधील या आराखड्याची फेरमांडणी करून २०३०पर्यंतच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी, आयआयटी, मुंबईतील 'जीआयएसई हब' या विज्ञान आणि अभियांत्रिकी यांची सांगड घालणाऱ्या तज्ज्ञ गटांच्या मदतीने पुढील वर्षभरात फेरआखणीचे काम करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त सौरभ राव यांनी दिली.

**फेरआखणीचा उद्देश**

शहरातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सर्वसमावेशक वाहतूक आराखड्याचा अभ्यास करणे, त्यात सुचवण्यात आलेल्या उपायांच्या अमलबजावणीचा आढावा घेणे आणि बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक ते उपाय व सूचना करणे हा या फेरआखणीचा मुख्य उद्देश आहे.

### मूळ आराखडा सन २०१८चा

मेट्रो रेल्वेच्या नियोजनाचा भाग म्हणून ठाणे महापालिकेतर्फे संपूर्ण महापालिका क्षेत्राचा सर्वसमावेशक वाहतूक आराखडा तयार करण्यात आला होता. २०१०पासून या आराखड्याचे काम सुरू करण्यात आले. २०१८मध्ये त्यास अंतिम स्वरूप देण्यात आले. त्यात, मेट्रो मार्गांचे आरेखन, ठाणे पूर्व येथील सॅटीस प्रकल्प, ठाणे-मुलुंड दरम्यानचे नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक, आनंद नगर ते साकेत कोस्टल रोड, भुयारी मार्ग आदींबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. ठाणे शहराची वाढ लक्षात घेऊन लोकसंख्येच्या घनतेप्रमाणे वाहतूक व्यवस्थापन करण्यात आले होते.

## केडीएमसीच्या "क" प्रभागात ३६ लाख ४४ हजार ८३५ रुपये थकबाकी रक्कमे पोटी मालमत्ता सील करण्याची कारवाई



**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण पश्चिमेतील " क" प्रभाग क्षेत्रातील मालमत्ता कराची रक्कम थकीत असलेल्या मालमत्तांना वारंवार नोटीस देवूनसुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या उपआयुक्त स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली "क" प्रभागाचे सहा.आयुक्त धनंजय थोरात व अधिक्षक उमेश यमगर यांच्या पथकाने रक्कम रु. ३६ लाख ४४ हजार ८३५ इतक्या रकमे पोटी मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई नुकतीच केली.

यामध्ये कल्याण (पश्चिम) गोविंदवाडी येथील मुसा बिल्डींग मधील शेख मुसा शेख नासीर यांच्या मालमत्ता क्र. C०३०१६३११७००रक्कम रु. १० लाख ६६ हजार ३७५ थकबाकीपोटी दुकान क्र. १,२,३ व ५ सील करण्यात आले.

कल्याण (पश्चिम) आग्रा रोड येथील बोरगांवकर टॉवर मधील धुरापतारी बी.गुप्ता यांच्या मालमत्ता क्र. C०१०१२८५६४००/००४ रक्कम र १९ हजार ५३२ रुपये थकबाकीपोटी सील करण्यात आले.

कल्याण (पश्चिम) आग्रारोड येथील ममता टॉवर मधील. ईश्वरलाल एल.वेलाणी, एम.आर. पटेल, एस.आय.वेलाणी आणि एन.आर.रंगाणी यांच्या मालमत्ता क्र. C०१०१४२२६१००/ ऑफीस-१ रक्कम रु. ३ लाख १६ हजार ७८० थकबाकीपोटी सील करण्यात आले.

कल्याण (पश्चिम) टिळक चौक येथील लेले आळी येथील स्वप्निल भाऊराव ईरांडे यांच्या मालमत्ता क्र. C०१०१२०७३१००/१०१-A रक्कम रु. १७ लाख ८९ हजार ४९९ थकबाकीपोटी सील करण्यात आले.

कल्याण (पश्चिम) टिळक चौक येथील लेले आळी येथील केतन मनोहर मांडे यांच्या मालमत्ता क्र. C०१०१२०७३१००/SHOP-४ रक्कम रु. १७ लाख ८९ हजार ४९९ थकबाकीपोटी सील करण्यात आले.




## शास्तीमाफीसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा

**पनवेल (भावना जैन) :** थकीत मालमत्ता कर न भरल्याने पनवेलकरांना महापालिका प्रशासनाने लादलेल्या मालमत्ता करावरील शास्ती माफीसाठी भारतीय जनता पक्षाने राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात मालमत्ता कराचा मुद्दा गाजला. भाजप नगरसेवकांनीच कर पनवेलकरांवर लादला हे पटविण्यात काहीअंशी विरोधकांना यश मिळाले. परंतु मालमत्ता करापेक्षा सर्वाधिक चर्चा माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या करावरील शास्तीमाफीच्या घोषणेची झाली. आ. प्रशांत ठाकूर यांनी घोषणेपूर्वीच माजी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे शास्तीमाफीसाठी अभय योजना राबविण्याची विनंती केली होती. अजूनही अध्यादेश जाहीर न केल्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू केल्याची माहिती आ. ठाकूर यांनी दिली.



# “मला दुसरं लग्न करावं लागतंय”, ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’मधील सावत्या असं का म्हणाला?

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ या लोकप्रिय कार्यक्रमाचं नवं पर्व सुरू झालं आहे. विदेशातील दौरे झाल्यानंतर २ डिसेंबरपासून ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमाचं नवं पर्व प्रेक्षकांच्या भेटीस आलं आहे. त्यामुळे सध्या या कार्यक्रमातील कलाकार चर्चेत आले आहेत. अशातच ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’मधील सावत्या म्हणजेच अभिनेता रोहित मानेचं एक वक्तव्य चर्चेत आलं आहे. त्याने दुसऱ्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे? पण, रोहित माने असं का म्हणाला? जाणून घ्या...

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमातील प्रत्येक कलाकार नेहमी चर्चेत असतात. या कलाकारांनी आपल्या विनोदी शैलीनं प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. या कार्यक्रमामुळे बऱ्याच नवोदित कलाकारांना नवी ओळख मिळाली असून ते रुपेरी पडद्यावर देखील पाहायला मिळत आहेत. त्यापैकी एक म्हणजे रोहित माने.

अलीकडेच रोहितने हास्यजत्रेमधील कलाकारांबरोबर ‘प्लॅनेट मराठी’ या एंटरटेनमेंट न्यूज चॅनेलशी संवाद साधला. यावेळी शिवाली परबला उपस्थितीत असलेल्या कलाकारांची कार्टुनबरोबर तुलना करायला सांगितलं. तेव्हा शिवाली म्हणाली, “सावत्या म्हणजे माझ्यासाठी शिजुका आहे. कारण मी कॉलेजमध्ये असताना तो नाटक वगैरे करायचा. मी त्याला बघायला जायचे. तो माझा क्रश होता.”

पुढे शिवाली म्हणाली की, रोहितचं एक नाटक मी आठ ते नऊ वेळा मुंबईत बघितलंय. इतकं मी त्याला बघायला जायची. नोबितासाठी शिजुका कशी आहे, तसं माझ्यासाठी सावत्या आहे. शिवाली परबचं हेच बोलणं ऐकून एकच हशा पिकला. तेव्हा मजेत रोहित माने म्हणाला की, “मला दुसरं लग्न करावं लागतंय.”

दरम्यान, रोहित मानेच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’चं नवं पर्व सुरू होण्याआधी त्याचं गाणं प्रदर्शित झालं होतं. ‘खेळ झाला सुरू’ असं रोहितच्या गाण्याचं नाव होतं. लवकरच तो प्रसाद खांडेकरच्या चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहेरे, प्राजक्ता माळीसह हास्यजत्रेतील बरेच कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत.

# करीना कपूर-सैफ अली खानच्या मुलांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिली खास भेट



बॉलीवूडचे शोमॅन म्हणून ओळखले जाणारे राज कपूर यांची १४ डिसेंबरला १००वी जयंती आहे. यानिमित्ताने कपूर कुटुंबियांनी एक मोठा कार्यक्रम आयोजित केला आहे. या शताब्दी कार्यक्रमात दिग्गज कलाकार मंडळींसह नेते उपस्थित राहणार आहेत. याच निमित्ताने कपूर कुटुंब पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रण देण्यासाठी दिल्लीत गेलं होतं. नीतू कपूर, रणबीर कपूर, करिश्मा कपूर, करीना कपूर, सैफ अली खान, आलिया भट्ट, आदर जैन, अनीसा मल्होत्रा या कपूर कुटुंबातील सदस्यांनी दिल्लीतील पंतप्रधानच्या निवासस्थानी जाऊन मोदींची भेट घेतली आणि त्यांना आमंत्रण दिलं. याचे फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. तसंच कपूर कुटुंबातील सदस्यांनी देखील फोटो शेअर केले आहेत.

अभिनेत्री करीना कपूरने नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीचे फोटो करीनाने शेअर केले आहेत. करीनाने हे फोटो शेअर करत लिहिलं आहे, “आमचे दिग्गज आजोबा राज कपूर यांचा विलक्षण जीवनप्रवास चित्रपटांच्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर येणार आहे. या खास गोष्टीचं आमंत्रण देण्यासाठी आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यासाठी मोदींची मी आभारी आहे.” पुढे करीना कपूरने लिहिलं की, आजोबांच्या कलात्मकतेची, दूरदृष्टीची आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाची १०० गौरवशाली वर्षे साजरी करत असताना, आम्ही त्यांच्या वारशाच्या शाश्वत प्रभावाचा सन्मान करतो, जो आम्हाला आणि येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत आहे. त्यांचे प्रतिष्ठित चित्रपट प्रदर्शित करण्यात आणि ‘राज कपूर १०० फिल्म फेस्टिव्हल’द्वारे भारतीय चित्रपटसृष्टीवर त्यांनी केलेल्या कामाची आठवण करून देण्याचा आम्हाला अभिमान वाटतो. १३ ते १५ डिसेंबरपर्यंत फिल्म फेस्टिव्हल असणार आहे. १० चित्रपट, ४० शहरात आणि १३५ चित्रपटगृहात प्रदर्शित करण्यात येणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीत एक खास गोष्ट पाहायला मिळाली. ते म्हणजे मोदी यांनी करीना-सैफची मुलं तैमूर आणि जेहसाठी एक खास भेट दिली. नरेंद्र मोदींनी एका कागदावर टीम ( तैमूर ) आणि जेहचं नाव लिहित स्वतःची सही केली. याचा फोटो करीनाने तिच्या इन्स्टाग्राम आणि स्टोरीला देखील शेअर केला आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीचे फोटो करीनासह करिश्मा कपूर, रिधिमा कपूर यांनी देखील सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यामुळे सध्या कपूर कुटुंब खूप चर्चेत आहेत.

# चियान विक्रमच्या “वीरा धीरा सुरण पार्ट २” या चित्रपटाचा टीझर व्हायरल




मुंबई, दाक्षिणात्य अभिनेता चियान विक्रमच्या ‘वीरा धीरा सुरण पार्ट २’ या चित्रपटाचा शानदार टीझर रिलीज झाला आहे. तामिळ आवृत्तीच्या टीझरला रिलीजच्या काही तासांतच पाच दशलक्षाहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. रिया शिबू निर्मित आणि एस. यू. अरुण कुमार दिग्दर्शित या चित्रपटात चियान विक्रमसोबत एस. जे. सुरिया, सूरज वेंजारामूडू, दुशारा विजयन आणि इतर स्टार्सनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत.

चियान विक्रमचा किडा लूक टीझरमध्ये पाहायला मिळतो आणि पोलीस आणि गुन्हेगार यांच्यात जंगलापर्यंतचा बदलत जाणारा क्रमही दिसतो. निर्मात्यांनी टीझरमध्ये बरेच सस्पेन्स आणि थ्रिल घटक ठेवले आहेत. १ मिनिट आणि ४७ सेकंदाचा टीझर चियान विक्रमच्या हातात धारदार शस्त्रे आणि ॲक्शन सीक्वेन्ससह अनेक प्रश्नांसह संपतो.

“वीरा धीरा सूरन पार्ट २” हा एक संगीतमय चित्रपट आहे, जी व्ही प्रकाश कुमार यांनी संगीतबद्ध केला आहे, चित्रपटाचे छायाचित्रकार थेनी इसवार आहेत. चित्रपटाचे संपादन जीके प्रसन्ना यांनी केले असून कला दिग्दर्शन सीएस बालचंदर यांनी केले आहे. एचआर पिक्चर्सच्या रिया शिबूने या बिग बजेट चित्रपटाची निर्मिती केली आहे. रियाने याआधी मुंबईकर, ठग्स, मुरा यांसारख्या अनेक मोठ्या चित्रपटांची निर्मिती केली आहे. रिया शिबू आरआरआर आणि विक्रम या सुपरहिट चित्रपटांची वितरकही आहे. रिया शिबू निर्मित या चित्रपटाचा अप्रतिम टीझर पाहून आपण म्हणू शकतो की ॲक्शन थ्रिलर असण्यासोबतच यात प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी भरपूर मसाला आहे. चित्रपटाचे व्हिज्युअल आधीच रिलीज झाले होते ज्यांना १४ दशलक्षाहून अधिक व्ह्यूज मिळाले आणि अनेक रेकॉर्ड मोडले. चित्रपटाच्या टीझरमध्ये दाखवण्यात आलेल्या जबरदस्त सीन्समुळे चाहत्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. सध्या वीरा धीरा सुरण भाग २ चे शूटिंग संपले असून आता चित्रपटाचे पोस्ट प्रोडक्शनचे काम जोरात सुरू आहे. वीरा धीरा सुरण भाग 2 पुढील वर्षी जानेवारीमध्ये एकाच वेळी अनेक भाषांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट हिंदीसह तमिळ, तेलगू भाषेतही चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील बड्या कुटुंबात वाद; ज्येष्ठ अभिनेत्याने पत्रकारावर केला हल्ला



ज्येष्ठ दाक्षिणात्य अभिनेते मोहन बाबू मांचू आणि त्यांचा धाकटा मुलगा मनोज मांचू यांच्यात मालमत्तेवरून वाद सुरू आहेत. बुधवारी सायंकाळी प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी त्यांच्या घरी या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी गेले असता मोहन बाबू यांनी व्हिडीओ कव्हरेज करणाऱ्या पत्रकाराचा माइक हिसकावून त्याच्यावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर दिग्गज टॉलिवूड अभिनेते मोहन बाबू यांच्या अडचणीत वाढ झाली असून, याप्रकरणी मोहन बाबू यांच्यावर १० डिसेंबर २०२४ रोजी रंगारेड्डी जिल्ह्यातील जलपल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी एका पत्रकारावर हल्ला केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली, जेव्हा सगळे पत्रकार अभिनेत्याच्या निवासस्थानी त्यांच्या कौटुंबिक वादाचे कव्हरेज करण्यासाठी गेले होते. पहारी शरीफ पोलिसांनी भारतीय न्यायिक संहिता (BNS) कलम ११८ (१) अंतर्गत याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. गेटवर बाऊन्सरशी झालेल्या वादानंतर मनोज मांचूने सुरक्षा कर्मचारी आणि पत्रकारांसह जबरदस्तीने घरामध्ये प्रवेश केल्याची घटना घडली. हे सर्व पाहून मोहन बाबू आक्रमक झाले आणि त्यांनी अपशब्द वापरल्याचा आरोप पत्रकाराने केला आहे. यावेळी त्याच्याकडून त्याचा माईक हिसकावून, हल्ला करण्यात आल्याने पत्रकाराला दुखापत झाली आहे. या घटनेनंतर घरातील बाऊन्सर्सनी सर्व पत्रकारांना परिसर सोडण्यास भाग पाडलं.

# प्रिया बेर्डे यांना भविष्यात साकारायचीय ‘कालीमातेची’ व्यक्तिरेखा

प्रिया बेर्डे या मराठी चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखल्या जातात. विनोदी चित्रपटांसाठी अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, महेश कोठारे अशा अभिनेत्यांच्या बरोबरीनेच प्रिया बेर्डे यांनादेखील ओळखले जाते. ‘गृहलक्ष्मी’, ‘अशी ही बनवाबनवी’, ‘एक होता विदूषक’, ‘धरलं तर चावतंय’ अशा अनेक चित्रपटांतून प्रिया बेर्डे यांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले. आताही त्या विविध प्रकल्प, टीव्ही मालिका यांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसतात. सध्या त्या ‘मुलगी पसंत आहे’ या मालिकेत काम करताना दिसत आहेत. आता नुकतेच त्यांनी भविष्यात कोणती व्यक्तिरेखा साकारायला आवडेल, यावर वक्तव्य केले आहे. प्रिया बेर्डे यांनी नुकताच ‘अल्ट्रा मराठी बझ’बरोबर संवाद साधला. यावेळी भविष्यात त्यांना कोणती व्यक्तिरेखा साकारायला आवडेल, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बोलताना त्यांनी म्हटले, “मला पौराणिक कथा फार आवडतात. त्यामुळे मला देवीची आणि त्यातही कालीमातेची भूमिका करायला मिळाली, तर आवडेल. माझ्याकडे पौराणिक कथांची खूप पुस्तकं आहेत. महाभारतातील सगळ्या व्यक्तिरेखांची पुस्तकं माझ्याकडे आहेत. मला त्यातील सगळ्या व्यक्तिरेखा आवडतात. कोणे एकेकाळी महाभारतावर नाटक येणार होतं; पण ते आलंच नाही. त्यामध्ये द्रौपदीच्या भूमिकेसाठी त्यांनी मला विचारलं होतं. ही ३५-४० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. ते काही झालं नाही; पण माझ्या मनात ती गोष्ट राहून गेली. माझ्या आईनं ‘सौभद्र’मध्ये रुक्मिणी ही भूमिका साकारल्याचं मला आठवते. सौभद्र हे संगीत नाटक आहे. तर, ती रुक्मिणी कधी साकारायला मिळाली, तर मला आवडेल. मला अमुक अमुक गोष्टी करायच्या आहेत वगैरे अशा काही इच्छा माझ्या राहिल्या नाहीत. मला इन्स्पेक्टर, रॉ एजंट अशाही भूमिका करायला आवडेल.” चित्रपटसृष्टीत तुम्हाला इतक्या वर्षांचा अनुभव आहे. तर मग त्यातील कोणती मौल्यवान



गोष्ट शेअर करायला आवडेल, अशा आशयाचा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर बोलताना प्रिया बेर्डे यांनी म्हटले, “खरं सांगायचं, तर मी माझं आयुष्य या कलासृष्टीमध्ये घातलेलं आहे. मीच नाही, तर माझे आई-वडील, मामा-मामी, काका-काकू, आजी-आजोबा, माझे संपूर्ण खानदान या चित्रपटसृष्टीत आहे. ही माझी मनोरंजन सृष्टी माझ्या चांगल्या-वाईट क्षणांची साक्षीदार आहे. जेव्हा जेव्हा मी एकटी पडले किंवा होते तेव्हा तेव्हा मला इंडस्ट्रीने साथ दिली आहे. त्यामुळे मला ज्या ज्या वेळी वाटलं की, सगळं संपत चाललं आहे, प्रिया बेर्डे संपत चालली आहे अशा वेळी मला याच इंडस्ट्रीनं वरती बाहेर काढलं आहे. ते क्षण माझ्यासाठी फार महत्त्वाचे आहेत. ‘अशी ही बनवाबनवी’ चित्रपटाच्या वेळी मी नुकतीच उभारी घेत होते. इंडस्ट्रीमध्ये मी नवीनच आले होते. माझं खानदान इंडस्ट्रीमधील असूनसुद्धा मला त्याचा काही उपयोग नव्हता. माझ्या स्वतःच्या कर्तृत्वावरच मला काम करावं लागलं. दुसरं म्हणजे लक्ष्मीकांत गेले, त्यावेळी मी काम करत नव्हते. तुम्ही काम सोडलेलं असताना परत जेव्हा तुम्ही पुनरागमन करता त्यासाठी लागणारं बळ असतं, ते या इंडस्ट्रीनंच मला दिलेलं आहे. तेव्हा मला ही गोष्ट सतत जाणवते की, माझा मौल्यवान क्षण हाच आहे की, ज्या ज्या वेळी मी त्या गर्तेत सापडले, त्या त्या वेळेला माझ्या इंडस्ट्रीनं आणि माझ्या परमेश्वरानं मला त्यातून बाहेर काढलं आहे. ही कलानगरी, मनोरंजन सृष्टी माझ्यासाठी देव आहे.”

दरम्यान, अरुण सरनाईक, संजीव कुमार, रंजना, नीतू सिंह, रेखा, रीना रॉय, प्राणसाहेब, राजशेखर, दत्ता साळवी, अमरीश पुरी, डॅनी हे कलाकार आवडत असल्याचे त्यांनी सांगितले. ‘अशी ही बनाबनवी’, ‘गोंधळात गोंधळ’, ‘मुंबईचा फौजदार’, हे मराठी चित्रपट आवडतात. तर हिंदीमधील ‘चुपके चुपके’, ‘अंगूर’, ‘बावर्ची’, ‘खूबसुरत’, ‘नौकर’, हे पाच चित्रपट आवडतात, असेही प्रिया बेर्डे यांनी सांगितले.

# मेहंदी रंगली गं! ‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ फेम अभिनेत्रीची लगीनघाई



मराठी कलाविश्वात सध्या लग्नसराई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. सोनाली-अभिषेक, निखिल राजेशिर्के, रेश्मा शिंदे या कलाकारांपाठोपाठ आता छोट्या पडद्यावरची आणखी एक अभिनेत्री लग्नबंधनात अडकणार आहे. ‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ या मालिकेतून घराघरांत लोकप्रिय झालेली अभिनेत्री विरीशा नाईक आता लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे.

‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ ही मालिका गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेतील प्रत्येक पात्राने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. मालिकेतील भुवनेश्वरी, अधिपती, अक्षरा, चंचला, दुर्गेश्वरी हे कलाकार घराघरांत लोकप्रिय आहेत. यामध्ये चंचलाची भूमिका साकारणारी अभिनेत्री विरीशा नाईक लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. अभिनेत्रीचा मेहंदी सोहळा नुकताच पार पडला. याचे खास फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

विरीशाने काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत लग्नबंधनात अडकणार असल्याचं जाहीर केलं होतं. यानंतर तिच्या लग्नपत्रिकेमुळे ती उद्या ( १२ डिसेंबर ) विवाहबंधनात अडकणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. तिच्या घरी आता लग्नाआधीच्या विधींना सुरुवात झालेली आहे. विरीशाचा होणारा पती सुद्धा लोकप्रिय अभिनेता आहे. त्याचं नाव आहे प्रशांत निगडे. लेखक, दिग्दर्शक, अभिनेता आणि नाट्य निर्माता म्हणून प्रशांत ओळखला जातो. यापूर्वी त्याने ‘स्टार प्रवाह’ वाहिनीवरील ‘स्वाभिमान’ मालिकेत ‘बबन’ ही भूमिका साकारली होती. सध्या तो ‘लक्ष्मीच्या पावलांनी’ मालिकेत ‘रॉकेट’च्या भूमिकेत पाहायला मिळत आहे. आता प्रशांतला त्याच्या खऱ्या आयुष्यातली लक्ष्मी ही विरीशाच्या ( चंचला/चंची ) रुपात मिळाली आहे. या दोघांचा साखरपुडा ऑगस्ट महिन्यात पार पडला होता. आता दोघंही १२ डिसेंबर रोजी विवाहबंधनात अडकणार आहेत.

दरम्यान, प्रशांत आणि विरीशा यांनी एका नाटकात मध्यवर्ती भूमिका साकारल्या होत्या. याशिवाय सध्या रंगभूमीवर सुरू असलेल्या ‘आय एम पुंगळया शारुक्या आगीमहुळ’ नाटकात दोघंही नवरा-बायकोची भूमिका साकारत आहेत. आता हळदी सोहळा पार पडल्यावर ही लोकप्रिय जोडी लग्नबंधनात अडकणार आहे.




**मेष** – नव्या ओळखी हितकारक ठरतील. व्यवसायावरील पकड सैल होणार नाही याची दक्षता घ्या. आपले डावपेच यशस्वी होतील.

**वृषभ** – आपल्या कामातील सातत्य जपण्यावर भर द्या. आरोग्याच्या किरकोळ तक्रारी भेडसावतील. व्यवसायात नव्या संधी मिळतील.

**मिथुन** – नोकरीधंद्यात तडजोडीचे धोरण स्वीकारावे लागेल. कुटुंबातील सलोखा जपण्यास प्राधान्य द्या. रागावर नियंत्रण ठेवा.

**कर्क** – आपले महत्त्व सिद्ध करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करावे लागतील. मुलांच्या कलाने घ्याल. उद्दिष्टपूर्तीसाठी मित्रांचे सहकार्य लाभेल.

**सिंह** – आपल्या कामास उत्तम गती प्राप्त होईल. विरोधक अडथळा आणण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या क्षेत्रात तुमचे वर्चस्व वाढेल.

**कन्या** – कार्यक्षेत्रातील स्पर्धेस तयार राहावे. आर्थिक व्यवस्थापनाचे कौशल्य सिद्ध कराल. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**तूळ** – आर्थिक व्यवहारास योग्य वळण द्या. मोहाचे प्रसंग अनुभवाल. आपल्या कार्यप्रणालीत अचूकता आणाल. जास्त भावूक होऊ नका.

**वृश्चिक** – लहानसहान समस्यांचा सामना करण्याच्या तयारीत राहावे. आपल्या कामास न्याय देण्यावर भर द्या. जवळचे लोक गैरफायदा घेतील.

**धनु** – श्रमाचे चीज झाल्याने मनास समाधान लाभेल. कौटुंबिक कारणास्तव खर्चाची तयारी ठेवावी लागेल. सदैव सकारात्मक विचार करा.

**मकर** – पैशांचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घ्या. नवीन मित्र मिळतील. ध्येयावर लक्ष द्या. घरातील व्यक्तींसाठी वेळ द्यावा लागेल.

**कुंभ** – आर्थिक अनिश्चिततेवर मात करण्यासाठी नवे डावपेच आखाल. आर्थिक व्यवहारात ज्येष्ठांचा सल्ला घ्या. वाहन जपून चालवा.

**मीन** – प्रयत्नाने यश मिळवण्याचा प्रयत्न करा. मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता निर्माण होईल. धंद्यात अपेक्षित वाढ करता येईल.

# रेल्वेचं ख्रिसमस गिफ्ट, मुंबईतून दररोज अतिरिक्त ५६ रेल्वे धावणार



**मुंबई (विशाल कारंडे)** - रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. डिसेंबर महिन्यात ख्रिसमसच्या सुट्ट्या असतात. त्यामुळे अनेकजण बाहेर फिरायला जाण्याचा प्लान करत असतात. सुट्ट्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. डिसेंबर महिन्यात रेल्वे काही अतिरिक्त गाड्या सोडणार आहे. प्रवाशांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

मध्य रेल्वे ख्रिसमस आणि हिवाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई - करमाळी/ कोचुवेली आणि पुणे - करमाळी दरम्यान ४८ विशेष गाड्या चालवणार आहे.

**तपशील खालीलप्रमाणे:-**

१. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - करमाळी - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दैंनदिन विशेष - ३४ सेवा

०११५१ विशेष दि. २०.१२.२०२४ ते दि. ०५.०१.२०२५ पर्यंत मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून दररोज ००.२० वाजता सुटेल आणि करमाळी येथे त्याच दिवशी १३.३० वाजता पोहोचेल. (१७ सेवा)

०११५२ विशेष दि. २०.१२.२०२४ ते दि. ०५.०१.२०२५ पर्यंत करमाळी येथून दररोज १४.१५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी ०३.४५ वाजता पोहोचेल. (१७ सेवा)

**थांबे :**

दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ आणि थिवि.

**संरचना:**

एक वातानुकूलित प्रथम श्रेणी, एक प्रथमसह द्वितीय वातानुकूलित, तीन द्वितीय वातानुकूलित, ११ तृतीय वातानुकूलित, २ शयनयान, २ सामन्य द्वितीय श्रेणी आणि २ लगेजसह गार्ड्स ब्रेक व्हॅन.

# राज्यपालांच्या उपस्थितीत गीता जयंती महोत्सव साजरा



**मुंबई (यश सावंत) :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील कांदिवली येथे बुधवारी सायंकाळी गीता जयंती महोत्सव साजरा झाला. 'भगवद्गीता' एक कालातीत मार्गदर्शक ग्रंथ असून आजही अत्यंत समर्पक आहे. भगवद्गीता आपल्याला जगणे शिकविते, असे प्रतिपादन राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी केले. पोईसर जिमखाना आणि इस्कॉन जुहू यांच्यामार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार आशिष शेलार, आमदार मनीषा चौधरी, आमदार संजय उपाध्याय, माजी खासदार गोपाळ शेट्टी, भगवद्गीता शिक्षा अभियान समितीचे अध्यक्ष डॉ. योगेश दुबे, जुहू इस्कॉनचे अध्यक्ष श्री. ब्रज हरी दास, पोईसर जिमखानाचे अध्यक्ष मुकेश भंडारी, अमेरिकेच्या टेक्सासचे अटॉर्नी जनरल कॅन टॅक्सन आदी यावेळी उपस्थित होते. राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, भगवद्गीता हा भारतातील ज्ञान आणि बुद्धीचा उत्कृष्ट ग्रंथ आहे. प्रत्येकाने स्वच्छ मनाने आणि फळाची चिंता न करता एकाग्रतेने आपले कर्तव्य करत रहावे, यशाच्या रूपाने फळ आपोआप मिळेल, असे गीता शिकविते. समाजातील प्रत्येकाला शिक्षण, आरोग्य, निवास आदी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेने गरजूंना या किमान सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी पुढाकार घेऊन इतर देशांसमोर आदर्श निर्माण करावा, आपणही यासाठी सहकार्य करू, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जगातील सर्व प्रगत देशांनी यासाठी प्रयत्न केल्यास चांगली समाज निर्मिती होऊन मानवाचा हॅपिनेस इंडेक्स वाढेल, असा विश्वास राज्यपाल श्री. राधाकृष्णन यावेळी व्यक्त केला.

SPORT

# Novak Djokovic will run out of energy: Andre Agassi



**BENGALURU :** Andre Agassi wondered if the 24-time major winner Novak Djokovic would miss his greatest rivals -- the now-retired Rafael Nadal and Roger Federer -- in the last leg of a glittering career where the 37-year-old goes for more history.

The eight-time Grand Slam champion, in the city for the TiE Global Summit, assessed Djokovic's run and the Serb's recent partnership with friend and rival Andy Murray in a candid chat with media.

It's hard to say, Father Time always wins. He has already done so much for so long, it's hard to imagine longer. We said that about (Roger) Federer too. I think Novak will run out of energy more than capability. Cannot be easy, especially when the people you came to the dance with have left, that's a big thing.

When Pete (Sampras) retired it was a blow to me, it set me back a little bit. It made me rediscover my inspirations on some level. Djokovic has lost the guys he made history with. It'll probably get tougher and tougher emotionally, but I would never bet against them. Bet against them at your peril.

In any coach-student relationship you need trust and trust can take time, but it's nice when it starts with believing in somebody because you know that they know your experience. There's an asset to their history as competitors.

Any success of a relationship is based on complete buy-in and that's always the part you have to wait and see. It's not what I know that changes your career, information doesn't lead to transformation, somebody has to counter that. That's the connector. I'm sure there's going to be a lot of trust immediately, we'll see how the results go.

Alcaraz defends like Novak, has more power and spin like Nadal, hands and finesse like Federer but just because he has the best of all the three doesn't mean he can do what they did. There are so many parts to the game such as decision-making, injuries, luck. So how long can (Alcaraz and Jannik Sinner) do it (for)? They could do it for 20 years or not.

**American men haven't had results like the women:**

The women's game hasn't had to deal with Roger Federer, Novak Djokovic, Rafael, Jannik Sinner and Carlos Alcaraz, but they have their version of it. Serena Williams is the Novak of the women's game and you got Coco as a potential, like Alcaraz has potential and Sinner has potential.

How the game evolves is interesting. The women's game has gotten very powerful, just straight power. For lack of a better example, Lindsay Davenport was powerful, tall, precise through the court and now you have a lot of that. There's still room for somebody who can offset that kind of power, like an Ash Barty.

The men's game has changed in the sense that guys have gotten bigger with longer levers, which means they're better athletes, they can move and they need more time, they start playing further back. Soon you're going to start seeing the net game start coming back, everything morphs in its own way. But the biggest issue for American (men) not winning is an unfortunate set of decades where the guys were very stingy and very greedy -- 66 Grand Slams in the same generation. There's not a lot left there (for others)!

# 'He Has Always Been...': LSG Owner Sanjiv Goenka Praises 'Very Talented' KL Rahul



**New Delhi** - Indian Premier League franchise Lucknow Super Giants owner Sanjiv Goenka has reserved big praise for star Indian batter KL Rahul. Rahul was associated with LSG from 2022 to 2024. He played three seasons in the IPL for the Lucknow-based franchise after joining them for Rs 17 crore ahead of the IPL 2022 mega auction and scored 1410 runs in 38 matches. Under Rahul's leadership, LSG finished in the top four of the IPL 2022 points table and secured a place in the playoffs.

The 32-year-old right-handed batter was released by LSG ahead of the IPL 2025 mega auction, which was held in Jeddah on November 24 and 25. The former RCB, SRH, and PBKS batter then joined Delhi Capitals for Rs 14 crore and is expected to lead the franchise in the upcoming season of the world's richest franchise cricket league.

During his recent appearance on the TRS show, Goenka was asked about Rahul, and in response he said that the right-handed batter is like his family.

"KL mere liye hamesha se family rahe hai and hamesha family rahenge. He served as Lucknow captain for three years and performed well as a batter. Mere dil se unke liye hamesha dua hi niklegi, no matter what happens. He is a very gentle man. He is so talented. Jitna unka talent hai, vo ubhar ke bahar aaye. I have so much love and respect for him in my heart," Goenka said.

Rahul, who made his IPL debut in 2013 for RCB, has played a total of 132 IPL matches so far for four teams and has 4683 runs to his name. In the 2024 edition of the cash-rich league, the Karnataka-based batter played in all 14 matches for Lucknow Super Giants, and with the help of four half-centuries, scored a total of 520 runs. He finished the season as the leading run scorer for the franchise.

KL, who is one of the few cricketers to serve as India captain in all three formats of the game, is part of the Indian Test team these days, and he played in both the Test matches of the ongoing Border-Gavaskar Trophy. Rahul opened for India in the first two matches and scored 77 runs in the second innings of the series opener played at Optus Stadium in Perth, which India won by 295 runs.

# AUS W vs IND W Third ODI: Smriti Mandhana Creates History, Hits Century In Perth



**New Delhi** - The Indian women's cricket team star opener Smriti Mandhana created history as she became the first female batter to smash four ODI hundreds in a calendar year. The left-hand batter reached the milestone while taking part in the third ODI against Australia on Wednesday, December 11 at the WACA in Perth. The likes of Belinda Clark (1997), Meg Lanning (2016), Amy Satterthwaite (2016), Sophie Devine (2018), Sidra Amin (2022), Nat Sciver-Brunt (2023) and Laura Wolvaardt (2024) smashed three hundreds in a calendar year.

Mandhana also matched the record of Sri Lankan batter Chamari Athapaththu who scored the most Women's ODI hundreds (9). Former England skipper Charlotte Edwards and Sciver-Brunt have nine hundreds under their belt. Australian player Meg Lanning holds the feat of most Women's ODI hundreds (15).

While batting in the first two ODIs, she was able to score only eight and nine runs respectively. But then she made a brilliant comeback and ended up making 105 runs off 109 balls with 14 fours and a six in the third ODI against Australia.

India Squad: Harmanpreet Kaur (captain), Smriti Mandhana (vice-captain), Priya Punia, Jemimah Rodrigues, Harleen Deol, Richa Ghosh (wicket-keeper), Tejal Hasabnis, Deepti Sharma, Minnu Mani, Priya Mishra, Radha Yadav, Titas Sadhu, Arundhati Reddy, Renuka Singh, Saima Thakor, Uma Chetry (wicket-keeper).

# ICC Chairman Jay Shah Meets 2032 Brisbane Olympics Organising Committee To Push For Cricket's Inclusion



**New Delhi** - With cricket set to make its return at the Summer Games with Los Angeles Olympics in 2028, ICC chairman Jay Shah looks determined to make the sport feature at the 2032 Brisbane Games as well. He feels the Olympics will serve as a great platform to boost the growth of the game.

Shah recently reached Australia for a meeting with the Brisbane Games' organising committee and is likely to head to The Gabba to watch the third Test of the ongoing Border-Gavaskar Trophy.

"Very exciting time ahead for Cricket's involvement in the Olympics movement – a meeting with the Brisbane 2032 organizing committee in Brisbane, Australia today (Thursday, December 12)," Shah wrote on X.

Earlier in August 2021, the International Cricket Council (ICC) formed a special working group which would advocate the idea of pushing cricket for its inclusion in the 2028 and 2032 Summer Olympics. The committee had representatives from the Asian Cricket Council (ACC), England and Wales Cricket Board (ECB), USA Cricket, and Zimbabwe Cricket.

After going through several discussions, the International Olympic Committee (IOC) gave the green signal for the Los Angeles Games a year ago. The decision was confirmed at the 141st IOC Session.

Shah officially took over the helm of ICC last week with a visit to its headquarters in Dubai. In his first speech as the chairman, he explained why cricket should be part of the Olympic roster and underlined how it would be significant in making the sport popular in every nook and corner of the world.

Team India has also reached Brisbane for the third Test. The 2024-25 Border Gavaskar Trophy is now currently level at one-all. India started the series on a promising note by winning the opener in Perth. Australia turned the tables in the second game in Adelaide with a dominant 10-wicket victory.

## साताऱ्यातील धरणांतून सिंचनासाठी विसर्ग सुरू, शेतकऱ्यांची चिंता दूर

● सातारा, दिगंबर जाधव:



जिल्ह्यातील प्रमुख सहा पाणी प्रकल्प अजूनही काठापर्यंत भरले असून, १४१ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे; पण सध्या रब्बी हंगामासाठी पाण्याचा विसर्ग सुरू झालेला आहे. त्यामुळे पुढील काळात विसर्गही वाढणार असल्याने धरणांतील साठाही कमी होणार आहे. तसेच आठवड्यापासून कोयना धरणातून सांगली जिल्ह्यातील सिंचनासाठी पाणी सोडले जात आहे.

सातारा जिल्ह्यात कोयना, धोम, बलकवडी, कण्हेर, तारळी आणि उरमोडी ही मोठी धरणे आहेत. जिल्ह्याच्या पश्चिम भागात असलेल्या या धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता सुमारे १४८ टीएमसी आहे. या धरणांतील पाण्यावर सातारा तसेच सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतील पाणी योजना अवलंबून आहेत. त्यामुळे पावसाळ्यात धरणे भरली की पुढील नऊ महिने चिंता करण्याचे कारण नसते. त्यातच यावर्षी जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या १२० टक्क्यांहून अधिक पर्जन्यमान झाले. या पावसामुळे प्रमुख धरणांबरोबरच छोटे प्रकल्प भरले आहेत. त्यामुळे उन्हाळ्यापर्यंत चिंतेचे कारण राहिलेले नाही.

# रायगडमधील शेतकऱ्यांना शेतीसाठी हवीत आता शेततळी

### बदलते ऋतुचक्र आणि अनियमित पावसामुळे शेतीचे होते नुकसान: शेतीच्या पाण्यासाठी पाणी अडवणे गरजेचे

● अलिबाग, विशाल पाटील :



रायगड जिल्ह्यातील भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील शेतकरी आता शेततळ्याकडे वळाले आहेत. भातशेती करताना उत्पन्न पेक्षा जास्त खर्च आणि मेहनत लागत असल्याने शेतकऱ्यांची आपोआप पावले तळे खोदण्या कडे वळली आहेत. मागील अनेक वर्ष खारेपाटातील शेतकरी शेतीसोबत मासेमारी करणारा आहे .एकीकडे कोकणात शेतकऱ्यांचा जोड व्यवसाय जरी वेगवेगळा असला तरी त्यावेळी ७० टक्के शेती व्यवसाय करणारे शेतकरी आणि ३० टक्के मासेमारी करणारे आहेत. मात्र आता हे गणित बिघडले आहे असून सध्यास्थितीला जवळपास ६०% शेतकरी मासेमारी व्यवसायाकडे वळू लागले आहेत.

मागील काही वर्षाचा विचार केला तर सतत घडत असणारे वातावरणातील बदल आणि वर्षभरात कधी येणारा पाऊस त्या बदलत्या ऋतूचक्रा मुळे शेतकऱ्यांचे अंदाज चुकत आहेत. परिणामी मेहनत करून केलेली भात शेती फुकट जात आहे. शेतीची मशागत, पेरणी, लावणी,कापणी, बांधणी ,झोडणी करून शेतात पिकवलेली सोन्यासारखे भात घरामध्ये येईपर्यंत यासाठी हजारो रुपये खर्च होत असून यासाठी मेहनत ही खूप करावी लागत आहे. मात्र शेतीसाठी जो खर्च होतो, तो खर्च सुद्धा निघत नाही. तर बऱ्याच वेळा कामासाठी कामगारही मिळत नाही. अनेकदा कामगारांसाठी भरमसाठ मजुरी भरावी लागते. या सर्व गोष्टीमुळे भात शेती करणारे शेतकरी या शेती व्यवसायाला कंटाळला असून त्या ऐवजी आपल्या शेतात शासनाच्या असणाऱ्या विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून शेततळे खोदून लाखो रुपये उत्पन्न घेणे पसंत करत आहे.

" मागील तीन वर्षात रायगड जिल्ह्यातील शेकडो हेक्टर शेतीत भात लागवड प्रमाण कमी होत चालले आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक शेतकरी शासनाच्या योजनेचा फायदा घेऊन मत्स्य व्यवसाय करीत आहेत.त्यामुळे रायगड जिल्ह्यातील बरेच शेतकरी आता भात शेतीचा खर्च परवडणार न झाल्याने शेततळ्याकडे वळाले आहेत. शासनाच्या योजनेद्वारे शेततळ्यातून चांगले उत्पन्न मिळत असल्याने अनेकांनी शेततळी तयार केली आहेत. शासनाच्या योजना अंतर्गत शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांना याबाबत लाभ मिळवून देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच शेततळ्याचा योजनांचा लाभ घ्यावा. कृषी विभागाकडून देखील शेततळे खोदण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असून मागील त्याला शेततळे योजना अंतर्गत वेगवेगळ्या मॉडेल साठी 15 15.३ मी पासून ३०.३० ३मी साठी २९००० ते ७५००० पर्यंत अनुदान उपलब्ध आहे. खारेपाट विभागासाठी दोन मीटर खोलीच्या शेततळ्यासाठी देखील शासनाने विशेष परवानगी दिली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आव्हान तालुका कृषी अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येत असून अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक व मंडळ कृषी कृषी यांच्याशी संपर्क करावा.

- सागर वारकर, पेण तालुका कृषी अधिकारी

# महाराष्ट्र राज्य लॉटरी नोव्हेंबर २०२४ चा भव्य सोडतीचा निकाल जाहीर

● मुंबई, विशाल कारंडे :

महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात पाच मासिक तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जातात.नोव्हेंबर २०२४ मध्ये मासिक व भव्यतम सोडतीतून २८,९९२ तिकिटांना ३ कोटी २६ लाख ७० हजार ८५० रुपये व साप्ताहिक सोडतीतून ५६,७४१ तिकीटांना रू. दोन कोटी ३१ लाख ६३ हजार ९०० ची बक्षिस जाहीर झाली आहेत, असे महाराष्ट्र राज्य लॉटरी वाशी येथील वित्त व लेखा विभागाचे उपसंचालक यांनी कळविले आहे. १ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र सह्याद्री, २ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र तेजस्विनी, ६ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र गणेशलक्ष्मी दिवाळी विशेष, १२ डिसेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र दिवाळी भव्यतम, १९ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र गजराज व दि. २०/११/२०२४ रोजी महाराष्ट्र गौरव या मासिक सोडती दुपारी ४.०० वाजता काढण्यात आल्या आहेत.

**या लॉटरी तिकिटांना जाहीर झालेले बक्षीस:-**

महाराष्ट्र सहयाद्री मालिका तिकीट क्रमांक MS-२४११D/४३०९८ या चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक यांचेकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू. ११ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र गणेशलक्ष्मी दिवाळी विशेष मालिका तिकीट क्रमांक GS-०६-३८६२ या महाराजा लॉटरी सेंटर, इचलकरंजी यांचेकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू. २२ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र दिवाळी भव्यतम सोडत तिकीट क्रमांक DI-०५ / ३८४६५ या न्यू जय अंबे लॉटरी भंडार, यवतमाळ यांचेकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू. एक कोटीचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे. महाराष्ट्र गजराज तिकीट क्रमांक GJ २४/७१३६ या न्यू जय अंबे लॉटरी भंडार, यवतमाळ यांच्याकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू.१४ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र गौरव तिकिट क्रमांक G१३/५७७१ या भारत लॉटरी, कोल्हापूर यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.३५ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस जाहिर झाले आहे. महा. सागरलक्ष्मी ते महाराष्ट्रलक्ष्मी या साप्ताहिक सोडतीमधून रक्कम रू. सात लाखाचे प्रथम क्रमांकाचे एकूण १० बक्षिसे जाहीर झाली आहेत.

सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून रक्कम. दहा हजारावरील वरील बक्षिसाची मागणी या कार्यालयाकडे सादर करावी. रक्कम रू. दहा हजाराच्या आतील बक्षिस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असे महाराष्ट्र राज्य लॉटरी वाशी येथील वित्त व लेखा विभागाचे उपसंचालक यांनी कळविले आहे.

## 'उडाण'मुळे पुणेकरांचा हवाई प्रवास झाला सोपा

### पुण्यातून १२ नव्या ठिकाणी सेवा सुरु

● पुणे, शकील शेख :

उडाण योजनेंतर्गत २०२४ मध्ये पुण्यातून १२ नवीन ठिकाणी विमानसेवा सुरु करण्यात आले. यामुळे विमान प्रवाशांना देशांतर्गत प्रवासाठी सोयीचे झाले असून, यातून वर्षभरात १ हजार १८० विमान उड्डाणे झाले आहेत. त्यातून ६९ हजार ६४६ प्रवाशांनी प्रवास केला आहे.




### भावनगरला उदंड प्रतिसाद

पुण्यातून १२ ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या या विमान सेवेत पुणे-भावनगर आणि भावनगर-पुणे याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. येल्या वर्षभरात पुणे-भावनगर दरम्यान २३२ उड्डाणे झाले असून, यातून ११ हजार ६३१ प्रवाशांनी प्रवास केला आहे. तर भावनगर-पुणे यादरम्यान २२० उड्डाणे झाले असून, यातून ११ हजार ५८८ प्रवाशांनी प्रवास केला आहे. त्यानंतर किशनघर, जळगाव, नांदेड या ठिकाणी प्रवास करणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

## हिवाळी अधिवेशन काळात शहरात खोदकाम करू नका

● नागपूर, नितीन देवळेकर :

१६ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी आणि अधिवेशनादरम्यान कुठल्याही यंत्रणेने किंवा नागरिकांनी शहरात खोदकाम करु नये, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत काही खोदकाम करणे आवश्यक असल्यास अशा खोदकामाची महावितरणला पूर्वसूचना दिल्यास होणारे नुकसान टळून ग्राहकांनाही त्रास होणार नाही, असे महावितरणच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

हिवाळी अधिवेशनादरम्यान शहरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणने युद्धस्तरावर तयारी ठेवली असून, यासाठी शहरातील सर्व विकास यंत्रणांनी सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. नागपूर शहरात मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पाणीपुरवठा, महानगरपालिका, दूरसंचार



विभाग, खासगी इंटरनेट आणि केबल टीव्ही कंपन्या यासारख्या अनेक विभागांमार्फत मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरु असून, त्यासाठी अनेक ठिकाणी मोठमोठ्या ड्रील मशीन्सच्या सहाय्याने खोदकामही करण्यात येत आहे. हिवाळी अधिवेशन काळात व्हीव्हीआयपी परिसरात वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी महावितरणकडून येथे पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. एका लाइनमध्ये बिघाड झाल्यास दुसऱ्या लाइनमधून वीजपुरवठा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

## गुंतवणूकदारांना राज्यात आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे विविध उपक्रम

● मुंबई, यश सावंत :

देश विदेशातील गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणुकीकरिता आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्य शासनमार्फत आता विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.

**देशी-विदेशी गुंतवणुकीसाठी**

गुंतवणूकदारांच्या प्रस्तावांसाठी त्यांना सल्ला व मदत देण्यासाठी "कंट्री डेस्क" या विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नवीन गुंतवणूकीसाठी जागतिक व प्रादेशिक गुंतवणूक व्यापारासह सुसंगत धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. राज्य सरकार व प्रमुख उद्योग गटांमध्ये समन्वय वाढवण्याच्या दृष्टीने औद्योगिक समन्वय सुधारणा होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.



महाराष्ट्रात प्राधान्याने गुंतवणूक व्हावी यासाठी संभाव्य गुंतवणूकदारांसोबत संवाद प्रस्थापित करण्यात येत आहे. याद्वारे गुंतवणुकीच्या दृष्टीने सातत्याने सहकार्य देण्यात येईल. आजपर्यंत झालेल्या सामंजस्य करारांची (MoUs) अंमलबजावणी जलद गतीने करण्यात येईल. त्याचबरोबर महाराष्ट्रातील गुंतवणूक संधींबाबत जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. याअंतर्गत बहुपक्षीय संस्थांशी आणि विकास बँकांशी सहकार्य वाढवणे, दूतावास व व्यापार संघटनांशी समन्वय वाढवणे, महाराष्ट्रातील मराठी प्रवासी समुदायाला गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणे आणि इलेक्ट्रॉनिक्स, कापड, ऑटोमोबाईल आणि औषधनिर्मिती अशा विविध क्षेत्रांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

### गुंतवणूकदारांना त्यांच्या प्रस्तावांमध्ये मदत करण्यासाठी "कंट्री डेस्क" विशेष कक्ष

- जागतिक आणि प्रादेशिक ट्रेंडशी सुसंगत नवीन गुंतवणूक धोरण
- शासन आणि प्रमुख औद्योगिक संस्थांमध्ये समन्वय वाढवणे
- संभाव्य गुंतवणूकदारांशी संवाद
- गुंतवणुकीच्या प्रक्रियेत गुंतवणूकदारांना सतत आवश्यक सहाय्य देणे
- सामंजस्य करारांचा पाठपुरावा करणे आणि अंमलबजावणीची गती सुधारणे
- राज्यातील गुंतवणुकीच्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे
- बहुपक्षीय संस्था आणि विकास बँकांसोबत काम करणे
- दूतावास आणि व्यापारी संघटनांसोबत समन्वय वाढवणे
- विशेषतः देशविदेशातील महाराष्ट्रीयन उद्योजक यांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित करणे
- इलेक्ट्रॉनिक्स, टेक्सटाईल, ऑटोमोबाईल्स, फार्मास्युटिकल्स यांसारख्या महत्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे

# धार्मिक स्थळांचं सर्वेक्षण किंवा त्यात बदल करण्याचा कुठल्याही न्यायालयांनी कोणताच निर्णय देऊ नये - सुप्रीम कोर्ट

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

**सर्वोच्च न्यायालयानं आज देशभरातील सर्व न्यायालयांना विद्यमान धार्मिक स्थळांवरील प्रलंबित खटल्यांमध्ये सर्वेक्षणाच्या आदेशांसह कोणतेही अंतरिम किंवा अंतिम आदेश देण्यास प्रतिबंध केला आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पी व्ही संजय कुमार तसंच के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं असेही आदेश दिले आहेत की, न्यायालय प्रार्थनास्थळे कायदा (विशेष तरतुदी), १९९१ ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करत असताना अशा प्रकारच्या दाव्यांवर कोणताही नवीन खटला दाखल करता येणार नाही. तसंच हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर**

तसंच यासंदर्भात दावे दाखल केले जाऊ शकतात. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यावर तात्पुरती कार्यवाही करण्यात यावी. मात्र न्यायालये सर्वेक्षणाच्या आदेशांसह कोणतेही अंतरिम आदेश किंवा अंतिम आदेश यासंदर्भात देणार नाहीत, असे आदेश खंडपीठानं दिले.

सध्या देशात १० मशिदी किंवा मंदिरांविरुद्ध १८ खटले प्रलंबित आहेत. खंडपीठानं प्रार्थनास्थळांच्या काही तरतुदींना (विशेष तरतूद) आव्हान देणाऱ्या याचिकांमध्ये प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी केंद्राला चार आठवड्यांची मुदत दिली आहे.



१९९१ चा कायदा, जो १५ ऑगस्ट १९४७ रोजी जी परिस्थिती होती. त्या प्रार्थनास्थळावर पुन्हा दावा करण्यासाठी किंवा त्याच्यात बदल करण्यासाठी खटला दाखल करण्यास प्रतिबंधित करतो त्यासंदर्भात यावर कोर्टात विचार होईल. या याचिकांमध्ये संबंधित प्रार्थनास्थळ कायद्याला आव्हान देण्यात आलं आहे की, हा कायदा हिंदू, जैन, बौद्ध आणि शीख धर्मीयांचे आक्रमणकर्त्यांनी नष्ट केलेली प्रार्थनास्थळे आणि तीर्थक्षेत्रे पुनर्संचयित करण्याचा अधिकार काढून घेतो, असा त्यावर आक्षेप आहे. यासंदर्भात काशी राजघराण्याची कन्या, महाराजा कुमारी कृष्णा प्रिया; भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी; चिंतामणी मालवीय, माजी खासदार; अनिल कबोत्रा, निवृत्त लष्करी अधिकारी; अधिवक्ता चंद्र शेखर; रुद्र विक्रम सिंह, रहिवासी वाराणसी; स्वामी जितेंद्रनंद सरस्वती, धार्मिक नेते; मथुराचे रहिवासी देवकीनंदन ठाकूर जी आणि धार्मिक गुरु आणि अधिवक्ता अश्विनी उपाध्याय यांनी १९९१ च्या कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.

१९९१ ची तरतूदच्या अनुषंगानं जमियत उलामा-ए-हिंद, इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड, व्यवस्थापन अंजुमन इंतेजामिया मशीद समिती जी ज्ञानवापी संकुलातील मशिदीचे व्यवस्थापन करते, या कायद्यातील काही तरतुदींच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांविरोधात मथुराच्या शाही इदगाह मशीद समितीनंही सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केले आहेत.

दाखल केलेल्या याचिकांमध्ये प्रार्थना स्थळे (विशेष तरतुदी) अधिनियम १९९१ च्या कलम २, ३, आणि ४ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिलं आहे, जे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचं आणि कायद्याच्या नियमाचे उल्लंघन करते. जो की घटनेच्या प्रस्तावनेचा अविभाज्य भाग आहे. याचिकेत म्हटलं आहे की, या कायद्यानं न्यायालयाकडे जाण्याचा अधिकार काढून घेतला आहे. कायद्याचं कलम ३ प्रार्थनास्थळांचं रूपांतरण प्रतिबंधित करते.

त्यात असं म्हटलं आहे, "कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही धार्मिक संप्रदायाच्या किंवा त्याच्या कोणत्याही विभागाच्या प्रार्थनास्थळाचे त्याच धार्मिक संप्रदायाच्या किंवा भिन्न धार्मिक संप्रदायाच्या किंवा त्याच्या कोणत्याही विभागाच्या पूजास्थानात रूपांतर करू नये.